


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




❋ वर्ष ६४ वे ❋ अंक २२५ ❋ नांदेड ❋ शुक्रवार, दि. २२ ऑगस्ट २०२५ ❋ पृष्ठे ६ ❋ किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा शरद पवार, उद्धव ठाकरे यांना फोन

## उपराष्ट्रपतीपदासाठी पाठिंबा मागितला

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंना फोन केला.

लोकसभा, विधानसभा निवडणुकांनंतर सध्या राज्याचे लक्ष लागले ते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे. मात्र, तत्पूर्वीच उपराष्ट्रपती जगदीश धनकड यांनी आपल्या पदाचा अचानक राजीनामा दिल्याने उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक जाहीर झाली आहे. भाजप एनडीएकडून उपराष्ट्रपतीपदासाठी महाराष्ट्राचे राज्यपाल सी. राधाकृष्णन यांना उमेदवारी जाहीर करण्यात आल्याने ही निवडणूक बिनविरोध व्हावी, अशीच भाजपची इच्छा आहे. मात्र, काँग्रेस इंडिया आघाडीकडूनही आपला उमेदवार जाहीर करण्यात आला आहे. विशेष म्हणजे गुरूवारी प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत बी. सुदर्शन रेड्डी यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. उपराष्ट्रपती पदासाठी एनडीए उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांना पाठिंबा मागण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार आणि उद्धव ठाकरे दोघांनाही फोन केला होता. उपराष्ट्रपतीपदाचे एनडीएचे उमेदवार राज्यपाल राधाकृष्णन हे महाराष्ट्रातील मतदार असल्याने त्यांना पाठिंबा द्यावा, अशी विनंती फडणवीसांनी दोन्ही नेत्यांकडे केल्याची सूत्रांची माहिती आहे. उपराष्ट्रपतीपदासाठीच्या निवडणुकीत आपला तुमचाही पाठिंबा हवाय, असे म्हणत मुख्यमंत्र्यांनी विरोधी पक्षातील प्रमुख नेत्यांना फोन केला. मात्र, काँग्रेस प्रदेशाध्यक्षांना फोन केल्याचे कुठलेही वृत्त नाही. त्यामुळे, फडणवीसांनी ठाकरे आणि पवारांना फोन करुन पाठिंबा मागितला आहे.

उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर मोठी जबाबदारी देण्यात आली आहे. महाराष्ट्रातील सर्वपक्षीय नेत्यांशी देवेंद्र फडणवीस संवाद साधत आहेत. उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी फडणवीस मविआतील वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करत आहेत. एनडीएच्या उमेदवाराला पाठिंबा देण्याबाबत ही चर्चा होत असून याबाबतची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे, त्याचाच एक भाग म्हणून फडणवीसांनी ठाकरे-पवारांना फोन केले. खासदार संजय राऊत यांनीही यास दुजोरा दिला आहे.

विरोधी पक्षांनी एकत्र येऊन बी. सुदर्शन रेड्डी यांची उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी दाखल केली. संसद भवनातील निवडणूक कार्यालयात एकजुटीचे दर्शन घडले, असे ट्विट खासदार संजय राऊत यांनी केले आहे. लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी, राज्यसभा विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे व इंडिया आघाडीतील पक्षातील प्रमुख नेत्यांसह 'उपराष्ट्रपती'पदाचे विरोधी पक्षाचे संयुक्त उमेदवार, सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी ह्यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी उपस्थित राहिलो. लढाई संविधान अन् लोकशाही बळकटीकरणाची आहे आणि आम्हाला ठाम विश्वास आहे कि, लोकशाही मूल्यांवर गाढा विश्वास असणारे 'उपराष्ट्रपती'पदाचे विरोधी पक्षाचे संयुक्त उमेदवार बी. सुदर्शन रेड्डी त्या विश्वासाला सार्थ ठरवतील, असे ट्विट शरद पवार यांनी केले आहे.

## राज ठाकरे यांनी घेतली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे गुरूवारी सकाळी अचानक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुख्यमंत्र्यांचा वर्षा निवासस्थानी भेट घेतली.

कालच बेस्टच्या पतपेढीचा निकाल जाहीर झाला. या निवडणुकीकडे राजकीय जाणकारांच लक्ष लागलं होतं. कारण उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी एकत्र येऊन ही निवडणूक लढवलेली. सध्या मनसे आणि उद्धव ठाकरे गटाची युती होणार अशी चर्चा आहे. मुंबई महानगरपालिकेची निवडणूक दोन्ही पक्ष एकत्र लढवणार अशी शक्यता आहे. त्याआधी बेस्ट पतपेढीच्या निवडणुकीत दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आले होते. त्यामुळे छोटी लिटमस टेस्ट म्हणून या निवडणूक निकालाकडे सगळे पाहत होते.

प्रत्यक्षात निकाल आला, तो दोन्ही ठाकरे बंधुसाठी मोठा झटका आहे. कारण त्यांना बेस्ट पतपेढीच्या निवडणुकीत भोपळाही फोडता आला नाही. त्या ऐवजी शशांक राव यांच्या युनियनला १४ आणि भाजपच्या पॅनलला ७ जागा मिळाल्या. ठाकरे बंधू एकत्र येऊनही काही फायदा होत नाही अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरु झाली. तेच गुरूवारी निकालाच्या दुसऱ्यादिवशी राज ठाकरे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी पोहोचले. त्यामुळे राजकीय वर्तुळात उलट-सुलट चर्चा सुरु झाल्या.

## विनाचिठ्ठी नशेच्या गोळ्या विकणाऱ्या कौठा आणि वाजेगाव येथील औषधी दुकानांवर कारवाई




**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील अन्न व औषधी प्रशासन व पोलिसांच्या विशेष पथकाने कौठा आणि वाजेगाव येथील मेडिकल दुकानांवर डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय नशा येणाऱ्या गोळ्या विक्री करतांना तपासणीत आढळून आले. तपासणी केलेल्या मेडिकल दुकांनावर कारवाई करण्यात आली.

दि. १८ ऑगस्ट रोजी नांदेड शहरातील वाजेगाव येथील शिवकृपा एजन्सी अ‍ॅन्ड मेडिकल स्टोअर्स तसेच दि. २० ऑगस्ट रोजी विष्णुपूरी कमानीजवळ असलेल्या श्री फॉर्मा मेडिकल आणि दि. २१ ऑगस्ट रोजी कौठा येथील शंभु मेडिकल येथे तपासणी केली. त्या ठिकाणी डॉक्टरांच्या परवानगी शिवाय नशा येणाऱ्या गोळ्या सहज दिल्या जात होत्या. ही कारवाई अन्न व औषधी प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त अ. तु. राठोड, पोलीस उपनिरिक्षक पंकज इंगळे, पोलीस अंमलदार रुपेश दासरवाड, प्रदीप खानसोळे, जसपालसिंघ कालो आदींनी ही कारवाई केली. यापुर्वी सुध्दा या पथकाने अनेक मेडिकल स्टोअर्सवर कारवाई केली होती.




**नांदेड :** आज साजरा होणाऱ्या बैल पोळा सणानिमित्त विविध बाजारपेठा सजल्या असून शेतकऱ्यांनी बैलांना सजविण्यासाठी लागणारे साहित्य खरेदीसाठी गर्दी केली होती.

## 'आपले नांदेड-सुरक्षित नांदेड'; नांदेड जिल्हा पोलीस दलाचा अभिनव उपक्रम

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा पोलीस दलाच्या वत्तीने सर्व गणेश मंडळासाठी आपले 'नांदेड- सुरक्षित नांदेड' हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे.

यामध्ये जे गणेश मंडळ त्यांच्या मंडपामध्ये ४ सीसीटीव्ही कॅमेरे लावतील त्या मंडळाचा पोस्टे प्रभारी अधिकारी यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात येईल. तसेच जे गणेश मंडळ त्यांच्या मंडपामध्ये ४ सीसीटीव्ही कॅमेरे लावतील, त्या मंडळाचा सत्कार उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात येईल. जे गणेश मंडळ त्यांच्या मंडपामध्ये १२ सीसीटीव्ही कॅमेरे लावतील, त्या मंडळाचा सत्कार अपर पोलीस अधीक्षक, नांदेड यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात येईल. जे गणेश मंडळ त्यांच्या मंडपामध्ये १६ सीसीटीव्ही कॅमेरे लावतील, त्या मंडळाचा सत्कार पोलीस अधीक्षक, नांदेड यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात येईल.

सदरील मंडळ हे गणेश उत्सव संपल्यानंतर गणेश मंडळाने लावलेले कॅमेरे हे त्यांचे गावातील चौकामध्ये महत्वाच्या ठिकाणी कायम स्वरुपी लावण्यात यावे. जेणेकरुन लोकसहभागातून आपले नांदेड सुरक्षित नांदेड ही संकलपना यशस्वी होण्यास मदत होईल. तसेच या उपक्रमा दरम्यान ज्या पोस्टे हद्दीमध्ये गणेश मंडळाने लावलेल्या कॅमेऱ्यांची संख्या जास्त असेल त्या पोस्टे प्रभारी अधिकारी यांचा सुध्दा प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे.

'आपले नांदेड-सुरक्षित नांदेड' या उपक्रमामध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी केले आहे.

## वायुगळतीमुळे ४ कामगारांचा मृत्यू

**मुंबई (प्रतिनिधी)–** बोईसर तारापूर एम आयडीसीतील कारखान्यात वायुगळती झाल्याची घटना घडली आहे. या वायू गळतीमुळे ८ कामगारांना बाधा झाली असून, त्यामधील ४ कामगारांचा मृत्यू झाला आहे, तर इतर कामगारांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बोईसर तारापूर एम आयडीसीतील प्लॉट नंबर एफ १३ मधील मेडली फार्मासिटिकल्स लिमिटेड कंपनी दुपारच्या सुमारास वायुगळतीची दुर्घटना घडली. ज्यात सदर ठिकाणी काम करत असलेल्या ८ जणांना बाधा झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली. कामगारांची प्रकृती बिघडल्यानंतर त्या सर्वांना तातडीने नजीकच्या शिंदे या खाजगी रुग्णालयात तात्काळ दाखल करण्यात आले. मात्र त्यांपैकी ४ कामगारांचा मृत्यू झाला. तसेच उर्वरित कामगारांची प्रकृती चिंताजनक आहे. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## मुखेड येथील न्यायालयाच्या नूतन इमारतीचे रविवारी उद्घाटन

**नांदेड (प्रतिनिधी)–** मुखेड येथील न्यायालयीन संकुलाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन रविवार, २४ ऑगस्ट २०२५ रोजी होणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संदिपकुमार सी. मोरे, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांच्या हस्ते होणार आहे.

या कार्यक्रमास उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबादचे न्यायमूर्ती नीरज धोटे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. हा कार्यक्रम प्रमुख जिल्हा न्यायाधीश सुनिल गं. वेदपाठक यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केला आहे, असे प्रबंधक जिल्हा न्यायालय नांदेड यांनी कळविले आहे.

## अतिवृष्टी व पुराच्या पार्श्वभुमीवर योग्य प्रकारे व्यवस्थापन करण्याच्या सूचना

**नांदेड (प्रतिनिधी)–** दि. १४, १५, १६, १७ व १८ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे नांदेड जिल्ह्यातील बहुतांश तालुक्यांमध्ये आपत्कालीन परिस्थिती निर्माण झालेली आहे. या अनुषंगाने वेळोवेळी जिल्हा प्रशासन व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्यामार्फत सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. या व्यतिरिक्त या आपत्कालीन परिस्थितीचे व्यवस्थापन करण्यासाठी खालील महत्त्वाच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तरी संबधित यंत्रणानी यांची नोंद घ्यावी, असे निर्देश जिल्हा प्रशासनाच्यावतीने दिले आहेत.

**जीवितहानी टाळण्याकरिता उपाययोजना**

पूर परिस्थिती अतिवृष्टी किंवा इतर कुठल्याही नैसर्गिक आपत्तीमध्ये जीवितहानी होणार नाही याची पूर्ण दक्षता प्रशासनाने व क्षेत्रीय यंत्रणेने घ्यायची आहे. त्याअनुषंगाने येणाऱ्या आपत्ती बाबत मिळालेली अधिकृत सूचना ही लोकांपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे याबाबत सर्व क्षेत्रीय यंत्रणांनी सतर्क रहावे.

आवश्यक त्यावेळी ज्या क्षेत्रात नागरिकांना धोका जास्त संभवतो अशा ठिकाणाहून नागरिकांचे स्थलांतर हे सुरक्षित ठिकाणी करणे आवश्यक ठरते याचे योग्य पद्धतीने नियोजन करावे. नागरिकांना योग्य पद्धतीने माहिती देऊन स्थलांतर करावे. स्थलांतर ज्या ठिकाणी होते ते ठिकाण सुस्थितीत असल्याची दक्षता घ्यावी तसेच स्थलांतराच्या ठिकाणी जेवण, पाणी व इतर व्यवस्था योग्य पद्धतीने करण्याची दक्षता घ्यावी.

पडझड झालेल्या घरांमध्ये जे नागरिक रहिवास करत असतील त्यांच्या जीवितास धोका संभवतो त्यामुळे अशा नागरिकांना सुद्धा सुरक्षित ठिकाणीच हलवून त्याठिकाणी त्यांची पूर्ण व्यवस्था करण्यात यावी. त्याचबरोबर पावसाचे किंवा पुराचे पाणी ओसरल्यावर आणि ऊन पडल्यावर घरांना भेगा पडून कच्ची घरे पडण्याची दाट संभावना असते अशा घरांवरही विशेष लक्ष देऊन त्या ठिकाणी धोकादायक घरांमध्ये कुणी राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

**बाधित क्षेत्रामधील स्वच्छता व आरोग्य राखणेबाबत**


पूर किंवा अतिवृष्टी सारख्या नैसर्गिक आपत्तीनंतर अस्वच्छतेमुळे मोठ्या प्रमाणावर रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सर्वप्रथम बाधित क्षेत्रामधील गाळ, जमा झालेला कचरा, मलबा इत्यादी बाबींची स्वच्छता करण्यात यावी यासाठी आवश्यक असल्यास टँकर किंवा अग्निशमन यंत्रांचा वापर करावा.


पूर किंवा अतिवृष्टी सारख्या नैसर्गिक आपत्तीनंतर पाणी दूषित होऊन जलजन्य आजार पसरण्याची शक्यता ही दाट असते. त्यामुळे **(पान ३ वर...)**

## राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाची मंडल यात्रा २३ रोजी नांदेडमध्ये

**नांदेड (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ओबीसी सेलचे राज्यप्रमुख राज राजापूरकर यांच्या नेतृत्वात राज्यात यात्रा सुरू असून ही यात्रा नांदेड शहरात दि. २३ ऑगस्ट रोजी येणार आहे.

क्रांती दिनापासून राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, सेलचे प्रदेश समन्वयक रोहिदादा पवार यांच्या उपस्थितीत ९ ऑगस्ट रोजी नागपूर येथे मंडल यात्रेला मोठ्या प्रमाणात प्रारंभ झाला आहे. ही यात्रा महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांत ३५८ तालुक्यांत ४ हजार ८७७ किलोमीटरचा प्रवास करणार आहे. प्रदेशाध्यक्ष शशीकांत शिंदे, फ्रंटल सेलचे राज्याचे समन्वयक आ. रोहितदादा पवार, प्रदेश उपाध्यक्ष भूषणसिंह होळकर, आ. उत्तम जानकर व सल्लागार हे या यात्रेत उपस्थित असणार असून सदर यात्रा दि. २३ ऑगस्ट रोजी शनिवारी नांदेड जिल्ह्यात येणार आहे. या यात्रेत जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते माजीमंत्री कमलकिशोर कदम, माजीमंत्री सुर्यकांताताई पाटील, माजीमंत्री डॉ. माधवराव किन्हाळकर हे यावेळी मार्गदर्शन करणार आहेत. या यात्रेत मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन ग्रामीण जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर व नांदेड शहर जिल्हाध्यक्ष डॉ. सुनील कदम यांनी केले आहे.




## विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेता अंबादास दानवे यांचा दौरा

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र विधान परिषदेचे विरोधी पक्षनेता अंबादास दानवे हे शुक्रवार २२ ऑगस्ट रोजी नांदेड जिल्हा दौऱ्यावर येत आहेत.

शुक्रवार २२ ऑगस्ट २०२५ रोजी हिंगोली जिल्ह्यातील गंगापुर ता. कळमनुरी येथून सकाळी ११ वा. मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथे पुरग्रस्त भागाची पाहणी व भेट. सकाळी ११.३० वा. मुक्रमाबाद येथून मुखेड तालुक्यातील हसनाळाकडे प्रयाण. दुपारी १२.१५ वा. हसनाळा येथे पुरग्रस्त भागाची पाहणी व भेट. दुपारी १२.४५ वा. हसनाळा येथून मोटारीने अर्धापूर मार्गे समृद्धी महामार्गाने छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.



जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# ट्रम्प यांचे 'टॅरिफ' राजकारण

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे जागतिक राजकारणातील सर्वात वादग्रस्त नेत्यांपैकी एक आहेत. त्यांच्या कार्यकाळातील निर्णयांनी केवळ अमेरिकाच नाही, तर संपूर्ण जग हलवून सोडले. राष्ट्राध्यक्षपद सांभाळताना त्यांनी घेतलेल्या आर्थिक धोरणांच्या मालिकेत सर्वाधिक लक्ष वेधून घेतले ते त्यांच्या अतिरिक्त आयात शुल्क (टॅरिफ) धोरणाने. आता पुन्हा एकदा त्यांनी अमेरिकेला, आणि अप्रत्यक्षपणे जगाला, १९२९ च्या ऐतिहासिक महामंदीची आठवण करून दिली आहे. ट्रम्प यांनी अलीकडेच त्यांच्या अधिकृत 'ट्रुथ' सोशल मीडिया खात्यावर एक पोस्ट टाकली. त्यात त्यांनी चेतावणी दिली आहे की, जर अमेरिकन न्यायालयाने आमच्या प्रशासनाने लादलेले अतिरिक्त आयात शुल्क रद्द केले तर अमेरिकेची अर्थव्यवस्था कधीच सावरू शकणार नाही. देश १९२९ सारख्या महामंदीला सामोरे जाईल, आणि विनाश अटळ ठरेल. ही भाषा केवळ राजकीय दबाव तंत्र म्हणून वापरली गेली आहे की, खरोखरच आर्थिक संकटाचे संकेत आहेत, हा प्रश्न आज सर्वत्र चर्चिला जातो आहे. ट्रम्प प्रशासनाने जागतिक व्यापार धोरणात कडक बदल घडवून आणले. चीनसह अनेक देशांमधून होणाऱ्या आयातीवरील शुल्कात मोठी वाढ करण्यात आली. परिणामी, जीवनावश्यक वस्तूंपासून ते तंत्रज्ञान उपकरणांपर्यंत अनेक उत्पादनांच्या किंमती वाढल्या. जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली. आंतरराष्ट्रीय व्यापार संबंध ताणले गेले. जागतिक व्यापार संघटना आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्या आकडेवारीनुसार, अमेरिकेतील सरासरी टॅरिफ दर ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळाच्या प्रारंभी फक्त २.४% होता. मात्र या धोरणामुळे तो थेट २०.१% वर गेला. काही बाबतीत तर मे २०२५ मध्ये चीनवरील टॅरिफ वाढविल्यानंतर २४.८% पर्यंत पोहोचला. हा आकडा १९०४ नंतरचा सर्वाधिक आहे. ट्रम्प यांच्या इशाऱ्यात १९२९ च्या महामंदीचा उल्लेख विशेष महत्त्वाचा आहे. त्या वेळी अमेरिकेच्या शेअर बाजारात झालेल्या घसरणीने जागतिक अर्थव्यवस्था उद्ध्वस्त झाली होती. लाखो लोक बेरोजगार झाले, बँका कोसळल्या, उद्योगधंदे बंद पडले. त्या काळातील आर्थिक घसरणीचा परिणाम पुढील दशकभर जाणवला. ट्रम्प यांच्या मते, न्यायालयाचा निर्णय प्रतिकूल आल्यास इतिहासाची पुनरावृत्ती होऊ शकते. अर्थतज्ज्ञांचे म्हणणे मात्र वेगळे आहे. अनेक स्वतंत्र अभ्यासकांच्या मते, ट्रम्प यांचे टॅरिफ धोरण अमेरिकन अर्थव्यवस्थेस दीर्घकालीन फायद्यापेक्षा तोटाच अधिक पोहोचवेल. आयात शुल्क वाढवल्याने स्थानिक उद्योगांना अल्पकालीन संरक्षण मिळू शकते, परंतु यामुळे स्पर्धात्मकता कमी होते, महागाई वाढते आणि आंतरराष्ट्रीय व्यापार भागीदारी धोक्यात येते. तसेच १९२९ च्या महामंदीच्या कारणांमध्ये टॅरिफ धोरण हे एक कारण असले तरी ते एकमेव नव्हते. आर्थिक असमतोल, शेअर बाजारातील फुगवटा, बँकिंग व्यवस्थेतील त्रुटी आणि चुकीची आर्थिक धोरणे हे सर्व घटक त्या आपत्तीला कारणीभूत होते. त्यामुळे ट्रम्प यांची तुलना केवळ राजकीय दडपण टाकण्यासाठी केल्याची शक्यता नाकारता येत नाही. अमेरिकन कायद्यांनुसार, राष्ट्रीय आणीबाणी जाहीर झाल्यावर राष्ट्राध्यक्षांना व्यापार निर्बंध लादण्याचे व्यापक अधिकार मिळतात. ट्रम्प यांनी या तरतुदीचा वारंवार वापर करून राष्ट्रीय सुरक्षेचा हवाला दिला आणि आयात शुल्क वाढवले. अनेक कायदे तज्ज्ञांच्या मते, हा वापर मूळ हेतूपेक्षा खूप पुढे गेला आहे. न्यायालय सध्या या धोरणाची वैधता तपासत आहे. जर निकाल ट्रम्प यांच्या विरोधात गेला. तर त्यांना राजकीय आणि आर्थिक दोन्ही आघाड्यांवर मोठा फटका बसेल. म्हणूनच त्यांनी 'महामंदी'चा इशारा देऊन जनमत आपल्या बाजूला वळवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. अमेरिका आणि चीनमधील टॅरिफ युद्धाने आधीच अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांवर परिणाम केला आहे. निर्यात-आयात अवलंबून असलेल्या देशांना पुरवठा अडचणींना सामोरे जावे लागले आहे. जागतिक महागाई वाढली आहे, आणि गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास डळमळीत झाला आहे. जर अमेरिकेत खरोखरच आर्थिक घसरण झाली, तर त्याचा परिणाम जगभर होईल. आत्ताच अमेरिकेतील पर्यटकांची संख्या १८ टक्क्याने कमी झाली आहे अर्थातच अमेरिकेच्या सध्याच्या मनमानी धोरणाचा पहिला फटका अमेरिकेलाच बसतो आहे. भारतासारख्या उदयोन्मुख बाजारपेठांनाही याचे फटके बसतील जसे निर्यात कमी होणे, परकीय गुंतवणुकीत घट, आणि चलन मूल्यात चढ-उतार हे अपेक्षित परिणाम आहेत. ट्रम्प यांचे वक्तव्य हे केवळ अमेरिकेच्या अंतर्गत राजकारणापुरते मर्यादित नाही; त्याचे जागतिक परिणाम होऊ शकतात. टॅरिफ धोरणाच्या योग्य-अयोग्यतेवर चर्चा होऊ शकते, पण व्यापार युद्ध आणि संरक्षणवादी भूमिका दीर्घकालीन स्थैर्याला धोका निर्माण करतात हे इतिहासाने दाखवून दिले आहे. १९२९ ची महामंदी ही केवळ अमेरिकेची नव्हे, तर जगाची आर्थिक दुर्घटना होती. आजही त्याच पद्धतीचे धोरण अवलंबून आर्थिक संकटाचे बी पेरले गेले, तर त्याचा फटका कोणालाच टाळता येणार नाही. त्यामुळे अमेरिकेच्या धोरणांकडे केवळ राजकीय नव्हे, तर आर्थिक शहाणपणाच्या दृष्टीनेही पाहण्याची वेळ आली आहे. जागतिक अर्थव्यवस्था विस्कळीत होऊ नये यासाठी ट्रम्प यांना देवाने सद्बुद्धी द्यावी हीच प्रार्थना.

# बैल पोळा

महाराष्ट्राच्या लोकजीवनात सण-उत्सव-समारंभ याला अनन्य-साधारण असे महत्व आहे. महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातही अनेक सण-महोत्सव साजरे केले जातात. महाराष्ट्रातील ग्रामीण-शहरी व आदिवासी समुदायात अनेक सण मोठ्या आत्मियतेने, निष्ठेने व श्रद्धेने हजारो वर्षापासून उत्साहात साजरे केले जातात. या सणांना उत्सवच का म्हणतात. तर ते मानवी शरीराला व मनाला सतत उल्हासित करतात. मनाला सतत नवनवीन गोष्टींविषयी उत्सुकता असते. यातूनच वेगवेगळ्या चांगल्या रूढी आणि परंपरांची निर्मिती झाली. या सणावारांच्या निमित्ताने वेगवेगळ्या जाती-धर्माची माणसे आपुलकीने, प्रेमाने व मायेने एकमेकांच्या अधिक जवळ येतात. हाच या सणांच्या पाठीमागील उद्देश असतो. तसेच निसर्गाचं ऋण फेडण्याचा मुख्य हेतूही साध्य होत असतो. शेतकऱ्यांच्या घरी बाराही महिने सणवार-उत्सव सुरूच असतात.



पंचमीनंतर महत्वाचा सण म्हणजे बैलपोळा. हा सण श्रावण महिना संपतेवेळी म्हणजे श्रावण अमावास्येला येतो. भारतीय ग्रामीण संरचनेतील पोळा हा सण तसा कृषी संस्कृतीतील अत्यंत महत्वाचा सण आहे. महाराष्ट्रातील मराठवाड्यासह काही भागात हा सण श्रावण अमावास्येला पश्चिम महाराष्ट्रात हा सण भाद्रपद अमावास्येला साजरा करतात. आदिवासी भागातही हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.महाराष्ट्रातली मंडळी ही उत्सवप्रिय आहे. मुळात बैल हा प्राणी अत्यंत कष्टाळू, प्रामाणिक, मालकाप्रती निष्ठा ठेवणारा, तसेच मायाळू व संवेदनक्षम असल्यामुळे त्याच्या उपकारातून उतराई होण्यासाठीच हा सण आपण साजरा करतो. पोळ्याच्या अगोदरच्या दिवशी खांदेमळण असते. बैलाच्या खांद्याला तूप आणि हळद लावली जाते. इथून पुढे खऱ्याअर्थाने शेतीची कामे गतिमान होत असतात म्हणून शेतकऱ्यांच्या जीवनात बैलाचे अत्यंत महत्व आहे. खांदेमळण करताना म्हटले जाते. आज आमंत्रण उद्या जेवायला असे म्हणून कासऱ्याने परातीवर वाजवले जाते.

बैलांना जेवणाचे निमंत्रण दिले जाते. त्याच्या कानात काहीतरी सांगितल्या जाते. पोळ्याच्या दिवशी भल्या पहाटे बैलांना शेतात चरण्यासाठी सोडले जाते. भरपेट चारा खाल्ल्यानंतर मग त्यांना नदीवर नाहीतर विहिरीजवळच्या हौदावर स्वच्छ पाण्याने अंघोळ घातल्यानंतर त्यांच्या शिंगांना वेगवेगळा रंग लावला जातो. याविषयी कवी यशवंत म्हणतो शिंगे रंगविली बाशिंगे बांधली चढविल्या झुली ऐनेदार. काही शेतकरी भगवा, पिवळा, निळा, लाल, हिरवा व केशरी रंगही बैलाच्या शिंगांना लावतात. बैल हा कृषीसंस्कृतीतील अत्यंत महत्वाचा प्राणी. तो माणसापेक्षा जास्त निष्ठावान व मायाळू असतो. बैलाच्या अंगावर वेगवेगळ्या रंगाच्या कापडी झुली घातल्या जातात. झुली घातल्यानंतर तर बैलांचा रुबाब हा अधिकच वाढतो. तो दिसायलाही छान धिप्पाड व रुबाबदार दिसतो. बैलाला घुंगरमाळा, बाशिंग, म्होरके, कान्ह्या, गोंडे अशा साज-शृंगाराने सजवले जाते. वर्षातला हा सण बैलांसाठी आणि शेतकऱ्यांसाठीही अत्यंत महत्वाचा असतो. शेतकरी राजा या दिवशी खूप आनंदात असतो. गावातील सगळ्या बैलांना ओळीने, जोडीने गावातील वेशीजवळ आणल्या जाते. एका मागून एक अशा बैलजोड्या रांगेत उभ्या असतात. अनेक हौशी शेतकरी आपल्या बैलांसमोर वाद्य वाजवून बैलांच्या अंगामध्ये संचार घडवून आणत असतात. वाजंत्र्याच्या जोशामुळे बैलामध्येही तो जोश यायला लागतो. सर्वच शेतकरी, बैलमालक नव्या कोऱ्या कपड्याने सजलेले असतात. त्यांच्याही आयुष्यातील बैलपोळा हा सण अतिशय महत्वाचा असतो. शेती आणि बैला-मुळे स्वत:च्या अस्तित्वाची आणि प्रतिष्ठेची जाणीवही शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर झळकत असते. ते बैलांचा कासरा आपल्या हातात धरून बैलपोळा सुटण्याची वाट पाहत असतात. पोळा ऐन रंगात येतो. मारुतीच्या पाराजवळ सर्व बैलांचं लग्न लावले जाते.

लग्न लागल्यानंतर मानकऱ्याची बैलं प्रथम वेशीमधून गावात प्रवेश करतात. अन मग हळूहळू बाकीच्या सर्वांच्या बैल जोड्या देखिल वेशीतून आपापल्या घराकडे जातात. थोडक्यात पोळा फुटतो. शेतकरी आपल्या जवळचे नारळ वेशीला फोडतात मग शर्यत लागावी तशी बैलं, गायी, माणसं नुसती एका मागून एक दुसऱ्याच्या मागे धावतात, पळतात, पडतात. परंतु यातील आनंद अवर्णनीय आहे. घरून बैलजोडी धरून पुन्हा मारुतीच्या मंदिराकडे दर्शनासाठी बैलांना आणल्या जाते. आणि मग त्यांना धोतराच्या आड झाकून ठेवलेले जू लाकडी बाजावर असते ते जू एका दिवसासाठी का होईना लपवून ठेवलेले असते. बैलाची उत्सुकता असते की, या बाजेवर काय असेल? तर तिथे जू आणि पुरणपोळीचा नैवेद्य असतो. शेतकऱ्याची पत्नी बैलाच्या पायावर पाणी टाकून तसेच कपाळाला हळदी कुंकू लावून बैल जोडीला ओवाळते. त्यांची पूजा करते. बैलाच्या बरोबरच शेतकरी राजा व लहान मोठी मुले यांनाही ओवाळले जाते. नंतर बैलांना पुरणपोळी खाऊ घालतात. यावेळी गाय, कालवड, गोरा यांचीही पूजा करतात. भारतीय संस्कृतीत बैलास अनन्य साधारण असे महत्व आहे. अनेक संदर्भाने नटलेला पोळा हा सण महाराष्ट्रात वेगवेगळ्या रूढी, प्रथा, परंपरांनी पहावयास मिळतो. बैलाच्या कष्टाविषयी एक लोकगीत असे..

बैल ईश्वराची कृपा
बैल अल्लाची नमाज,
बैल इसा आणि येशू
पाळू जुनाच रिवाज.

बैल ईश्वराची कृपा आहे. ईश्वराचे अस्तित्व आहे. तसेच तो मुस्लिमांची नमाज आहे. बैल हिंदू-मुस्लीमच नव्हे तर इतर धर्मानेही त्याचे अस्तिव मान्य केलेले आहे. बैल माणूस आहे, देवदूत आहे व ईश्वरही आहे. आणि म्हणूनच त्याची पूजा करण्याची खूप जुनी असलेली विचारधारा आम्ही ती रूढी, प्रथा, परंपरा, रिती कायम ठेवतो.

बैल माय आणि बाप
धान्य देणारी माऊली,
कसा धीर देतो राजा
जन्मभराची सावली.

बैल आई आहे तसाच तो पोसणारा बापही आहेच. या शिवाय वर्षभर पुरून उरेल असं धान्य देणारी ती माय-माउलीच आहे. हा धीरोदात्तपणा आपल्याला अडी-अडचणीला मदत करणारा धीर देणारा राजाच आहे. तसेच बैल म्हणजे जन्मभराची थंडगार सावली देणारं झाडही आहे. बैलाशिवाय कुणबीक होऊच शकत नाही. बैल गोठ्यातला श्वास महादेवाचा निवास,

कसे उपकार फेडू
बैल पोटातला घास.

बैल शेतातील गोठ्यातला श्वाश आहे, हुंकार आहे. भगवान शंकराचा त्या गोठ्यात म्हणूनच निवास असतो. बैलाचे उपकार अनंत आहेत. ते फिटतच नाहीत. कारण तो मानवाच्या पोटातील अन्नाचा कण आहे. बैलामुळेच शेतकऱ्याची मुले पोटभर अन्नाचा आस्वाद घेतात. बैल भरण-पोषण करणारा निसर्गाचा अग्रदूत आहे. बैल घराची विनंती

बैल मनाची श्रीमंती,
माझ्या बापासारखीच
त्याची रानात भ्रमंती.

घरादारातील माणसं जसा एकमेकांचा शब्द पाळतात. तो शिरसावंद्य मानून कामाला लागतात. तशाच पद्धतीने बैल जेव्हा वाटेल तेव्हा काम करायला तयार असतो. त्याला ना रात्र असते ना दिवस. तो आपली विनंती मान्यच करतो. ज्याच्या घरी बैल आहे त्या माणसांची आर्थिक परिस्थिती बेताचीच असली तरीही ती मनाने श्रीमंत असतात.

बैल नांगराचा फाळ
बैल हत्तीचही बळ,
असा कसा आला काळ ?
बैल बाजाराचा तळ.

बैल नांगरांचा फाळ आहे नांगर बलरामाचा आहे. खालची माती वर करणारा व वरची माती खाली नेणारा हा नांगर. अंतर्बाह्य बदल घडवणारा बैलच होय. दारिद्र्यातून भरभराटीकडे नेणारा बैलच आहे. तो हत्तीच बळ आहे. एका हत्तीचच नव्हे तर हजार हत्तीचही बळ आपल्यात घेऊन वावरणारा हा बैल ईश्वराचीच देणगी आहे. त्याचाच प्रसाद आहे. परंतु आज मात्र असा भयंकर काळ आलेला आहे की, आख्ख्या गावात बोटावर मोजण्याइतक्या माणसांच्या दारीच बैलाची दावण आहे.

बैल बाजारात विकण्यासाठी आलेला असतो, बैल बाजाराच्या तळात दिसतो. प्रत्येक शेतकऱ्यांना बैल सांभाळणे परवडत नसल्यामुळे तो बाजारात त्याला विकायला घेऊन जातो. शेतकऱ्याला तो बैल विकावासा वाटत नाही. परंतु खाण्याची आबाळ, निसर्गाचा लहरीपणा, अपुरा पाऊस, वैरणपाण्याचा प्रश्न, सांभाळण्याची कट-कट, त्याचं आरोग्य अशी एक ना अनेक कारणं त्यामुळे बैल बाजाराच्या तळात दिसतो.

बैल मातीतला मोती
कसं तुझं हे जगणं?
किती यंत्र आले तरी
तुला नाही रे मरण!

बैल हा मातीमधील सोनं, चांदी आहे. नव्हे बैल हा मातीतला मोती आहे. परंतु त्याच जगणं कसं आहे. हे जर आपण पाहिलं तर अंगावर शहारा येतो. तरी पण बैल माणसासारखा कण्हत नाही, कुथत नाही. दिलेलं काम मोठ्या निष्ठेने चोखपणे बजावतो. म्हणूनच या शेती व्यवसायात कितीही आधुनिकता आली, कितीही यंत्रे आली तरी कष्ट करणाऱ्या माणसाला, मातीला, शेतीला आणि बैलाला मरण नाही. हेच यावरून लक्षात येते. यापुढेही बैलाचे महत्त्व राहणारच आहे. त्यामुळे काल बैलाला जे महत्व होतं ते आज, उद्या व परवाही राहणारच आहे.

बैलपोळ्यानिमित्त सर्वांना मनः-पूर्वक शुभेच्छा!

**-शंकर नामदेव गच्चे**
नांदेड
मो. ८२७५३९०४१०

# 'तोंडात गोड आणि मनात खोड'

सध्या बरीच माणसे दिसायला वरवर चांगली दिसतात, परंतु त्यांच्या मनात खोड असते. आपल्याला असे बरेच उदाहरणे पाहता येतात की, छत्रपती शिवाजी महाराज यांना भेटण्यासाठी अफजलखान विजापूर येथून विडा उचलून वाईहून निघाला, पंढरपूर मार्ग तो प्रतापगडाच्या पायथ्याशी आला. तोंडामध्ये अतिशय गोड भाषा तो बोलू लागला. या राजे भेटा आम्हाला, तुम्ही आमच्या मुलासारखे आहात!, परंतु हे बोलणं त्याच फसवणूक (करणारे होतं. मनात कपट व खोड धरून गोड बोलून कायमस्वरूपी काटा काढण्यासाठी शामिन्यात आला होता, हे सर्व महाराजांनी ओळखून घेतले होते. त्यामुळे सोबत अंगरक्षक घेऊन अंगात चिलखत. बोटात वाघनखे, डोक्यावर जिरेटोप घालून ते त्याला भेटण्यासाठी अतिशय हुशारीने गेले होते, शेरास सव्वाशेर होते म्हणून महाराज वाचले, नसता इतिहास वेगळा झाला असता यालाच म्हणतात, तोंडात गोड आणि मनात खोड आहे. आज समाजामध्ये असे बरेच माणसं वेगवेगळे मुखवटे घालून फिरून फसवत आहेत. फक्त बोलताना अतिशय गोड बोलून आपल्या पायावर पाय देत आहेत, हे समाजातील लोकांनी ओळखून घ्यावे. जवळ बसणाऱ्या लोकसुद्धा अशा पद्धतीने वर्तन करत आहेत.

भाऊकीची लोक यामध्ये सर्वात पुढे असतात, कारण बोलण्याची भाषा वेगळी आणि वागण्याची भाषा वेगळी अलीकडच्या काळात तयार झाली आहे 'मुह मे राम। बगल मे छुरी' अशा पद्धतीने अगोदरपासूनच आपण ऐकतो. म्हणून सद्सद्विवेकबुद्धीने सध्याला वागण्याचा प्रयत्न करावे, कधीही कोणावरही शंभर टक्के विश्वास ठेवू नका? अति लोभ झाल्यानंतरसुद्धा वाईटपणा येतो, आणि मग असे माणसे मनात खोड ठेवून आपल्याला दगाफटका करण्याची दाट शक्यता असते. अनेक प्रेमवीर प्रेमिका सोबत गोड बोलत असतात आणि वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन अनैतिक कृत्ये करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. विवाहाचा विषय काढला की काय घाई आहे? आताच कोणते वय आपले झाले आहे, असे म्हणून चल पुढच्या... चल पुढच्या ओढ्यात असे गोड बोलून वेळ मारून नेतात आणि टाळतात.

हे सर्व सध्या सर्वत्र सुरूच आहे, त्यासाठी तुम्ही चाणाक्षबुद्धीने राहा, चला आपण इकडे जाऊ, तिकडे जाऊ, सहलीला जाऊ, मामाच्या गावाला जाऊ, देवदर्शन करून येऊ, म्हणून मुलींना गोड बोलून आपल्या मोहपाशात पाडून विश्वासात घेतात, आणि दगाफटका करतात. अपहरण करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे गोड बोलणाऱ्या लोकांपासून दोन हात दूर राहावे, काही लोक बरेच नाटकी असतात, दिसल्या बरोबर लगेच वाकून नमस्कार करणे, तोंड भरून स्तुती करणे किंवा तेवढ्यापुरतेच बोलून आपला हेतू साध्य करून घेणे आणि लगेच सोडून देणे असे ही काही गणगोत आहेत, त्यामुळे गोड बोलण्याला फसवू नका काल्पनिक बोलण्याला भाळू नका, बरेच जण काल्पनिक मोठेपणा सांगतात, आम्ही आता हे घेणार आहोत? ते घेणार आहोत? आता आम्ही लगेच मोठी खरेदी करणार आहोत? असे बोलतात आणि वास्तविकता वेगळी असते. म्हणून 'लबाडाचं आवतण जेवण केल्याशिवाय खरे नसते', म्हणून आज समाज प्रगतशील झाला. सत्ता, संपत्ती, पैसा जवळ आला, परंतु माणुसकी दूर गेली, कारण तुम्हालाच निवडून देऊ म्हणणारे लोकसुद्धा एका रात्रीत बदलून जातात, आणि निकाल दुसऱ्याच बाजूने लागतो, त्यासाठी तोंडात अतिशय गोडवा धरून बरोबर एखाद्याची कशी खोड मोडायची ते मोडतात. म्हणून तुम्ही सगळे जाणून निर्णय घ्या. निर्णय क्षमता तुमची मजबूत असावी. जाहिरात करते वेळेस लोक अतिशय गोड बोलतात. तुमच्याकडून जाहिरातीचे पैसे काढून घेतात, आणि त्या जाहिरातीतून नंतर वेगळाच अर्थ निघतो. मग ते परत आपल्याला बोलू देत नाहीत.

एके ठिकाणी जाहिरातीत ट्रॅक्टर खरेदीवर मारुती (फ्री) मोफत दिला जाईल असे बोलले, मात्र त्यांनी मारूती गाडी देण्याऐवजी मारुतीची मूर्ती ग्राहकांना मोफत दिली असेही काही गोड बोलून फसवणारे लोक आहेत. सध्या समाजात काही बाबा, भगत, बुवा, महाराज वावरत आहेत. हे अतिशय गोड बोलून मठाच्या वाऱ्या करायला लावत आहेत. पुढच्या वारीमध्ये तुमचं चांगलं होईल, असं नुसतं गोड बोलून अज्ञानी निरक्षर माणसाची फसवणूक करीत आहेत. पैशाचा पाऊस पाडतो म्हणून सुशिक्षित लोकांनासुद्धा भगत फसवतात, हे त्यांना फार उशिरा कळते, म्हणून अशा लोकांपासून होता होईल, तेवढे सावधान राहण्याचा प्रयत्न करावे, अति गोड बोलणं धोकादायक असते असे अनेक उदाहरणावरून आपल्याला सांगता येते, त्यासाठी आपण संपूर्ण माहिती घेतल्याशिवाय एखाद्या गोष्टीला होकार नकार देऊ नये. त्या ठिकाणची परिस्थिती पाहून निर्णय घ्यावे, तेव्हाच आपल्याला खरी माहिती मिळते, चुकीच्या माहितीतून आपला घात होतो, बरेच लोक फक्त गोड बोलून तुम्हीच यंदाच्या निवडणुकीत भावी...होणार आहात, तुमच्या एवढे हुशार कोण आहे, बाकीच्यांना काय कळते, असे अर्धसत्य बोलून मोठेपणा देऊन हरभऱ्याच्या झाडावर चढवतात, आणि नंतर चारी मुंड्या चीत करून फिदी फिदी हसत बसतात, हे होऊ नये म्हणून कोणाच्याही गोड बोलण्याला भाळून जाऊ नका, आपल्या माणसांना थोडा मोठेपणा कोणी दिला की आपण फार भाळून जातो, संपूर्ण घरदार त्यांना दाखवतो, जमीन -जुमला नोकर चाकर, डामडौल त्यामुळे पुढील व्यक्तीला आपला अंदाज येतो, आणि आपण फसतो, त्यामुळे अलीकडच्या काळामध्ये विवाहासाठी गोड बोलून मुली आणून देत आहेत, आणि दोन-तीन दिवसात त्या मुली त्या घरातून दाग दागिने, पैसे घेऊन पोबारा करत आहेत. गोड बोलून काम करून घेणे वेगळे आणि गोड बोलून मुद्दाम कपटनीतीने फसवणे वेगळे यात बराच फरक आहे. पुतना मावशी श्रीकृष्णाला दूध पाजण्यासाठी अप्सरेचे रूप घेऊन आली होती, मी कृष्णाची मावशी आहे. असे दरबारातील लोकांना सांगत होती, तिची ही कूटनीती श्रीकृष्णाने ओळखली होती. त्यामुळे तिला मरणाला सामोरे जावे लागले.

काही लोक फ्लॉट खरेदी-विक्रीमध्येसुद्धा गोड बोलून दोघांच्या नावावर खरेदी करून देतात, आणि मनातून फसवणूक करतात. महाभारतातील एक घटना वास्तविक आहे. धृतराष्ट्राने भीमाला आलिंगन देण्याची इच्छा व्यक्त केली, आणि त्यावेळेस तो गोड गोड बोलत असला तरी भीमाला त्याच्या बहुपाशात घेऊन ठार मारण्याची त्यांनी योजना आखली होती. ही कपटनीती श्रीकृष्णांनी ओळखली आणि धृतराष्ट्राच्या पुढे लोखंडी पुतळा तयार करून ठेवला. कपटनीती काय असते? कशा पद्धतीने वागून त्या घटनेमधून सही-सलामत बाहेर यावे, हे ज्याला कळते तो व्यवस्थित जीवन जगतो. कपटनीतीने किंवा कुटनीतीने दुसऱ्याला फसवण्यासाठी केलेले कृत्य स्वतःच्याच अंगावर आलेली आहेत, अशी काही उदाहरणं आहेत. म्हणून कपट नीतीचा अवलंब करू नका. स्वतः श्रम करा आणि मोठे व्हा, त्यावेळेस आपली कीर्ती वाऱ्यासारखी सर्वत्र पसरते, शेअर्स मार्केटमध्ये दुप्पट पैसे करून देतो म्हणून अनेक लोकांना सध्या फसवले जात आहे. मोहामुळे लोक फसत आहेत, म्हणून आपण कुठेही न फसता,आपला प्रपंच करावा नेटका, त्यावेळी सर्व बरे होईल असे मला वाटते.

**-प्रा. विठ्ठल बरसमवाड**
अध्यक्ष:
विठूमाऊली प्रतिष्ठान खैरकावाडी,
ता. मुखेड जि. नांदेड

# कृषी संस्कृतीतील आनंदाचा सण : पोळा

भारत हा कृषिप्रधान देश आहे. या देशातील जवळपास पासष्ठ टक्के लोक शेतीवर आपला उदरनिर्वाह करतात. शेती, शेतकरी, कृषी व ग्रामीण संस्कृती यांचा एक अतूट संबंध आहे. शेत शिवारात राबणारा शेतकरी कृषीजीवनाशी एकरूप होऊन अनेक सण, उत्सव मोठ्या उत्साहाने साजरे करतो. श्रावण महिन्यातील पिठोरी अमावस्येच्या दिवशी येणारा 'बैलपोळा' हा सण त्यापैकी एक आहे. 'पोळा' हा सण महाराष्ट्र, मध्य प्रदेश, कर्नाटक, छत्तीसगड व देशातील अन्य राज्यांमध्ये शेतकरी हा मोठ्या आनंदाने साजरा करतो. कष्टाचे 'जू' निरंतरपणे मानेवर ठेवून शेतात राबणारा मुकाजीव म्हणजे 'बैल'. या बैलजोडीच्या कष्टातून उत्तराई होण्याचा दिवस म्हणजे पोळा होय. महाराष्ट्र राज्यात या सणास पोळा, कर्नाटकमध्ये 'बेंदूर', दक्षिणेकडील राज्यांमध्ये 'मट्टू पोंगल' आणि उत्तर व पश्चिमेकडील राज्यात या सणाला 'गोधन' असे म्हणतात.



शेतकरी पोळ्याच्या आदल्या दिवशी आपल्या बैल जोडीची तूप व हळद लावून 'खांदमळणी' करतो. पोळ्याच्या दिवशी सकाळी लवकर उठून आपल्या बैलांना तो नदीवर नेऊन तेलाने मालिश करून त्यांना स्वच्छ आंघोळ घालतो. पोळ्याच्या दिवशी शेतात राब राब राबणाऱ्या या कष्टाळू जोडीस विश्रांती दिली जाते. त्यांच्या शिंगांना नवीन बेगड (रंग) लावतात. पाठीवर गेरूचे ठिपके, डोक्याला बाशिंग, गळ्यात घुंगरमाळा कवड्याची माळ, कसाटी, पायात चांदीचे कडे घालून, नवीन म्होरकी, वेसन, कासरा घातला जातो आणि त्यांच्या पाठीवर नवीन 'झुल' घालून त्यांना छान सजवले जाते. सायंकाळच्या वेळी सजलेले हे बैल गावातील मारुतीच्या देवळासमोर एकत्र येतात आणि मंदिराभोवती पाच प्रदक्षिणा घालतात. या दिवशी बैलांची सेवा करणाऱ्या सालगड्यांना (मजूरदार) नवीन कपडे असतात. या आनंदाच्या क्षणी सर्व शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहतो. पोळा या सणाच्या दिवशी सर्व शेतकरी एकत्र जमतात आणि एकमेकांना आलिंगन देऊन शुभेच्छा देतात. या दिवशी आपल्या लाडक्या बैल जोडीची शेतकरी सपत्नीक पंचारती करतो. त्यांची पूजा झाल्यावर त्यांना गोड पुरणपोळीचा नैवेद्य दिला जातो. म्हणून कृषी संस्कृतीमध्ये या सणास अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.

'पोळा' या सणाच्या दिवशी शेतकरी आपल्या गोठ्यातील गाई,म्हशी, वासरं या सर्व पशुधनाची मनोभावे पूजा करतो तसेच कृषी अवजारांची आरास मांडून त्याची पूजा केली जाते. कुदळ,खोरे, विळा,खुरपे,कुऱ्हाड, सबल, नांगराचा फाळ, वखराची पास, मोगड्याचा फण, जू, कोळपे, तिफन, बैलगाडी इत्यादी सर्व कृषीअवजारांची पूजा करतात.घरातील मुख्य द्वारावर आंब्याच्या पानाचे तोरण बांधून घरात गहू ज्वारी बाजरी या धान्याची रास मांडून त्यावर चिखलाचे बैल करून ठेवले जातात व त्या बैलांची हळद-कुंकू लावून आणि पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून विधिवत त्यांची पूजा केली जाते. या दिवशी गावातील सर्व ग्रामदैवतांना महादेव, मारुती, खंडोबा, विठ्ठल रुक्मिणी, कामाई, मसाई, जोखाई, सटवाई यांना शेंदूर लावतात त्यांच्यासमोर नारळ फोडून नैवेद्य दाखवतात आणि शेती पिकू दे, धान्य येऊ दे, बळीराजा सुखी होऊ दे. हा मंत्र जपला जातो.

कृषीसंस्कृतीतील शेतकऱ्यांच्या जीवनातील 'पोळा' हा सण अत्यंत आनंदाचा व उत्साहाचा मानला जातो.

परंतु अलीकडच्या काळात शेती ही आधुनिक पद्धतीने करण्यात येत आहे. नांगरणी, मोगडणी, पेरणी सरी मारणे ही सर्व कामे ट्रॅक्टरच्या सह्याने केली जातात त्यामुळे शेतीत यंत्र तंत्रांचा प्रभाव वाढला आहे. त्यामुळे 'बैल' या पशुधनाची संख्या खूप कमी झाली आहे.प्रचंड वाढत्या महागाईच्या या काळात, कृषीप्रधान असणाऱ्या देशात शेती मालाला कोणताही योग्य हमीभाव नाही. शेतकरी धोरण नाही तसेच शेतकऱ्यांचा आवाज उठवणारे राजकारणातही कोणी नाही त्यामुळे कृषी संस्कृती कोलमडून पडण्याच्या मार्गावर आहे. अल्पभूधारक शेतकऱ्यांना बैल जोडी पाळणे आजच्या काळात धोक्याचे बनले आहे त्यामुळे येणाऱ्या काळात कृषी संस्कृतीतील हा जीव नष्ट होतो की काय?ही चिंता वाटत आहे.

**-प्रा. डॉ. व्यंकटी पावडे**
नांदेड
मो. ९६५७२७८२१७

## थोडक्यात...

### भाजप महानगर चिटणीसपदी शैलेंद्रसिंह ठाकूर यांची निवड

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** धनेगाव ग्राम पंचायतीचे सदस्य शैलेंद्रसिंह हनुमानसिंह ठाकूर यांची नांदेड महानगर चिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



शैलेंद्रसिंह ठाकूर गत तीन दशकांपासून भारतीय जनता पार्टीचे सक्रिय कार्यकर्ते आहेत. पक्ष निष्ठ असलेल्या ठाकुर यांनी पक्षाच्या विविध पदावर काम करत नांदेड ग्रामीण भागात पक्षवाढीसाठी योगदान दिले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत पक्षाने त्यांची नांदेड महानगर चिटणीसपदी निवड केली आहे. त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

### गणेश उत्सवापूर्वी लाईट बसविण्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** गणेश उत्सवापूर्वी सिडको, हडको व परिसरातील विद्युत लाईट त्वरित बसवा, अन्यथा महानगरपालिका कार्यालयासमोर बल्प फोडो आंदोलन करण्यात येईल, या मागणीचे निवेदन महानगरपालिका आयुक्त यांना सामाजिक कार्यकर्ते यशवंत आवाळे पाटील यांनी दिले आहे.

त्यांनी दिलेल्या निवेदना म्हटले आहे की, येणाऱ्या गणेश उत्सव, गौरीपूजन, नवरात्र, दसरा हे मोठे सण येत आहेत. सिडको परिसरात लाईट नसल्याने रात्रीला अंधार पडत असून याचा मोठा त्रास होत आहे. येथील नागरिकांतर्फे महापालिकेला अनेकदा पत्रव्यवहार करूनही अद्याप या भागात लाईट लावले नाहीत. त्यामुळे येत्या ७ दिवसांत या भागातील सर्वच ठिकाणी लाईट लावावेत, अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आले.

# 'मौत का कुआँ' बनलेल्या देगलूर नाक्यावरील रस्त्याकडे गांधीगिरी करून वंचितने वेधले लक्ष

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील देगलूर नाका परिसरात असलेल्या खराब रस्त्याकडे लक्ष वेधण्यासाठी वंचित बहुजन आघाडीने 'मौत का कुआँ' या नावाने गांधीगिरी आंदोलन करून जनतेचे व प्रशासनाचे लक्ष वेधले.




या परिसरातील रस्त्यांची थातुर-मातुर दुरुस्ती न करता मजबुत कामे करण्यात यावे, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्यावतीने प्रशासनाकडे वारंवार करुन ही प्रशासन गांभीर्याने पाहत नसल्याने वंचितच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले.

नांदेड शहरात ये-जा करण्यासाठी अतिशय महत्त्वाचा असणारा देगलूर नाका परिसरातील रस्ता हा अतिशय खराब झाला असून या रस्त्यावर जागोजागी दोन-दोन फुटाचे खड्डे पडले आहेत. ज्यामध्ये अनेक दुर्दैवी घटना घडल्या असून या भागातून ये-जा करतान अनेक जणांचे प्राण गेले आहेत, तर अनेक जणांना जन्मभर अपंगत्व निर्माण झाले आहे. मोठ्या प्रमाणात रहदारी असणाऱ्या या रस्त्यावर वाहतूक शाखेचे कर्मचारी देखील अपुरे असतात. ज्यामुळे या भागात तासंतास वाहतुकीची कोंडी होते. या भागातून नांदेड शहरात येणारी अति महत्त्वाची रहदारी आहे. ज्यामध्ये अनेक रुग्णवाहिका देखील असतात. या भागातून वेळेवर दवाखान्यात न पोचल्यामुळे अनेक बाळंतीनींना जीव गमवावा लागला आहे. देश एकीकडे सुवर्ण महोत्सव साजरा करीत असताना नांदेडसारख्या जिल्ह्याचे ठिकाण असणाऱ्या शहरातील या भागातील रस्ते हे अतिशय दुर्गम भागात असणाऱ्या रस्त्यासारखे आहेत. डझनभर प्रस्थापित राजकारणी व प्रशासकीय अधिकारी या भागातून दररोज ये-जा करीत असतात, मात्र अनेकांचे जीव घेणाऱ्या या रस्त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते, असा आरोप वंचित बहुजन आघाडीच्यावतीने करण्यात आला आहे. वंचित बहुजन आघाडीच्यावतीने या भागात असणाऱ्या खड्ड्यामध्ये मौत का कुआँ असे फलक झळकावून त्या भागातून ये-जा करणाऱ्या वाहन धारकांना या खड्ड्यातून आपण सही सलामत वाचला म्हणून आपले स्वागत आहे, असे म्हणत पुष्पगुच्छ देऊन उपहासात्मक स्वागत केले.

वंचितच्या या गांधीगिरी आंदोलनाने परिसर दणाणला होता. अनेक तरुण हातात मौत का कुआँ असे फलक घेऊन आंदोलनात सामील झाले होते. यावेळी प्रशासना विरोधात जोरदार घोषणाबाजी देखील करण्यात आली. या भागात ५६ करोड रुपये उड्डाणपुलासाठी मंजूर झाले होते. त्याचे काय झाले असा सवाल देखील उपस्थित करण्यात आला. या रस्त्यावर येणाऱ्या अनेक नागरिकांची यावेळी उपाहासात्मक स्वागत देखील करण्यात आले. या भागातील रस्त्याची तात्काळ दुरुस्ती झाली नाही तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. या आंदोलनात वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव श्याम कांबळे, महानगर महासचिव महंमद कासीम, कायदेशीर सल्लागार ॲड. शेख बिलाल, उत्तर महानगरचे उपाध्यक्ष सादिक बाचोटीकर, दक्षिण उपाध्यक्ष झुबैर एक्का, दक्षिण संघटक अतिक लिडर, मिलिंद सितळे, युवा जिल्हा कार्याध्यक्ष शहाबुद्दीन पठाण, कुलदीप राक्षसमारे, मुस्लिम युथ फोरमचे प्रदेशाध्यक्ष उबैद लाला, दक्षिण उपाध्यक्ष सरफराज खान, मुश्ताक पठाण, फैजान बाटलीवाला, महंमद शोएब, सय्यद अशफाक, शेख जावेद, हाजी चौधरी, हुजैफा शाहेद, महंमद साहील, सामाजीक कार्यकर्ता मियाँ भाई सहीत असंख्य कार्यकर्त्यांनी व नागरिकांनी सहभाग घेतला होता.

# स्वारातीम विद्यापीठाच्या भाषा अभ्यास संकुलात 'शाहिरी'वर व्याख्यान

**नांदेड (प्रतिनिधी)–** 'महाराष्ट्रातील आधुनिक शाहिरी' या विषयावर प्रा. हंसराज जाधव यांचे व्याख्यान शुक्रवार, दि. २२ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजता, भाषा संकुलात आयोजित करण्यात आले आहे. या व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या भाषा, वाङ्.मय व संस्कृती अभ्यास संकुलाचे संचालक प्रा. दिलीप चव्हाण यांनी केले आहे.

जगभर लोकसाहित्य हे समाजाचा आरसा मानले जाते. ग्रामीण-आदिवासी समुदाय, स्त्रिया आणि बहुजन समाज यांनी या लोकसाहित्याची जोपासना केली आहे. मात्र, आधुनिक काळात हे मौखिक लोकसाहित्य दुर्मिळ होत चालले आहे. त्याच्या संवर्धनासाठी दरवर्षी २२ ऑगस्ट हा दिवस 'जागतिक लोकसाहित्य दिन' म्हणून साजरा केला जातो. या औचित्याने हे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

प्रा. हंसराज जाधव शाहिरी परंपरेतील अभ्यासक असून त्यांनी परिवर्तनवादी शाहिरी, महानुभाव पंथ तसेच आधुनिक शाहिरीवर लक्षणीय लेखन केले आहे. ते नामवंत कथाकार म्हणूनही ओळखले जातात. वाङ्.मयीन योगदानाबद्दल त्यांना विविध पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत.

या व्याख्यानातून विद्यार्थी, संशोधक व साहित्यरसिक यांना निश्चितच प्रेरणा व अभ्यासासाठी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त करून या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यापीठाचे प्र. कुलसचिव प्रा. डी. डी. पवार यांनी केले आहे.



**मुखेड –** उत्कृष्ट छायाचित्रकार आणि संकलक सोहम् स्वामी यांनी माध्यमिक आश्रम शाळा कमळेवाडीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी मु.अ. संदीप गेटकेवार यांनी त्यांचा सन्मान केला. सोबत शिवाजी अंबुलगेकर यांच्यासह शिक्षक आणि विद्यार्थी.

# राजीव गांधी महाविद्यालयात प्रा. डॉ. ज्योती सरकाळे यांचे अतिथी व्याख्यान संपन्न



**मुदखेड (प्रतिनिधी)–** राजीव गांधी महाविद्यालयातील इंग्रजी विभागाच्यावतीने प्रा. डॉ. ज्योती सरकाळे यांचे 'इंग्लिश अँज अ प्रोफेशनल स्किल: कम्युनिकेशन बियॉन्ड द क्लासरूम' या विषयावर अतिथी व्याख्यान नुकतेच आयोजित करण्यात आले. यावेळी त्यांच्या हस्ते इंग्रजी लिटररी असोसिएशन व इंग्रजी सर्टिफिकेट कोर्सचे उद्घाटनही करण्यात आले.

आपल्या प्रभावी मार्गदर्शनात प्रा. डॉ. सरकाळे यांनी विद्यार्थ्यांना व्यावहारिक इंग्रजी शिकण्यासाठी प्रोत्साहित करताना वाचन, श्रवण, संप्रेषण आणि लिखाण ही चतुसूत्रे आत्मसात करण्याचे आवाहन केले. संवाद परिपूर्ण होण्यासाठी शब्दांबरोबरच देहबोली तितकीच महत्त्वाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी कोणताही न्यूनगंड न बाळगता इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवावे व रोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे होते. आपल्या अध्यक्षीय समारोपात त्यांनी इंग्रजी भाषेला परकीय म्हणून न पाहता तिचे प्रभूत्व मिळवण्याचा विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावा, असे सांगितले. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने इंग्रजी शिकणे सुलभ झाले असले तरी स्वतः अस्खलित इंग्रजी बोलणे व लिहिणे हे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. राहुल धावरे यांनी केले तर प्रा. सुलोचना माळवे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन नाझिया पठाण यांनी केले. आभार वैष्णवी पवार यांनी मानले. महाविद्यालयाचे कर्मचारी मुकुंद डांगे यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

# राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाकडून ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त पोलीस अधीक्षक कार्यालयात वृक्षारोपण




**नांदेड (प्रतिनिधी)–** राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या (एनएसएस) ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय (फिल्ड ऑपरेशन्स डिव्हिजन), उपक्षेत्रीय कार्यालय, नांदेड यांच्यावतीने पोलीस अधीक्षक कार्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे उद्घाटन पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी विश्वसनीय सांख्यिकी माहितीच्या माध्यमातून पुराव्यावर आधारित धोरण निर्मितीमध्ये एनएसओच्या योगदानाचे कौतुक केले तसेच सांख्यिकी उपक्रमांना पर्यावरणीय आणि शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांशी जोडण्याचे महत्त्वही अधोरेखित केले.

कार्यक्रमाचा समारोप सहायक निदेशक उप-क्षेत्रीय कार्यालयाचे शरद शिंदे यांच्या आभार प्रदर्शनाने झाले. त्यांनी जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याबद्दल आभार मानले आणि एका अधिक हरित व जाणीवपूर्वक भारतासाठी एनएसओच्या दृष्टीकोनावर प्रकाश टाकला.

सदर कार्यक्रमाला राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाचे शांतनू प्रमाणिक, व. सां. अधिकारी, विजय डांगे, हेमंत चर्लेवार तसेच उप.क्षेत्रीय कार्यालय, नांदेड येथील इतर अधिकारी, कर्मचारी व पोलीस अधीक्षक कार्यालयातील पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

# नुकसान झालेल्या शेतीचे पंचनामे न करता सरसकट हेक्टरी २ लाख रूपये द्या -राष्ट्रवादीची मागणी

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** तालुक्यात मागच्या आठवड्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्याचे पंचनामे न करता सरसकट २ लाख रूपये मदत द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादीने निवेदनाद्वारे केली आहे.

तालुक्यात झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रम ाणात नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी हवालदिल झाला असून मुख्य नगदी पीक असलेले सोयाबीन, कापूस, हळद, केळी, उडीद ही पिके अतिवृष्टीमुळे आठवडाभरापासून पाण्याखाली आहेत. पिकांना मोड फुटून पिकांचे पूर्णतः नुकसान झाले आहे. तालुक्यातील मालेगाव, दाभड, अर्धापूर या तिनही मंडळातील सर्वच गावांमध्ये अतिवृष्टीमुळे पिकांचे म ोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या पिकाचे पंचनामे न करता शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी दोन लाख रुपये मदत द्यावी, अशी मागणी तहसीलदार रेणूकास देवणीकर यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

यावेळी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष आत्माराम कपाटे, विलास कल्याणकर, युवती ज्योती सोनटक्के, महेश राजेगोरे, जगन कल्याणकर, अनिकेत आवरदे, शुभम मठपती, दत्ता पारवे, कपिल कदम कोंडेकर, बालाजी कल्याणकर, शिवाजी कल्याणकर, नागेश कपाटे, ऋतिक गायकवाड, सूर्यकांत बोराटे, कुणाल इंगळे, रवी मनवर आदी उपस्थित होते.

# सिडको गुरूवार बाजार येथे शिवपुराण शिवकथेस भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** सिडको गुरूवार बाजार येथे श्रावणमास निमित्ताने आयोजित शिवकथाकर भागवताचार्य हभप अंकिताताई खांडगे यांचे शिवपुराण कथेस भाविक-भक्तांनी संततधार पावसातही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे.



सिडको गुरूवार बाजार शंकरनगर येथे शुक्रवार दि. १५ ते गुरुवार दि. २१ ऑगस्ट २५ दरम्यान श्रावण मासानिमित्त महाकाल कृपेने सिडको, नांदेड येथे भव्य शिवमहापुराण (शिवकथा) व अष्टोत्तर सहस्त्रधारा रुद्राभिषेक, सव्वा लक्ष बिल्वार्थना, महामृत्युंजय स्वाहाकार होमहवन, व गुरुवर्याचे तुलाभार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गुरुपुष्य अमृत योगावर परम पुज्य गुरुवर्यचे तुलाभार दि. २१ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता व अष्टोत्तर सहस्त्रधारा रुद्राभिषेक सकाळी ८ ते ९ महामृत्युंजय स्वाहाकार होम हवन ९ ते १०, प्रसाद सकाळी ११ ते १२, शिवमहापुराण (शिवकथा) दुपारी १ ते ४ असे कार्यक्रम पार पडले. भागवताचार्य हभप अंकिताताई खांडगे यांच्या सुमधुर वाणीतून तबलावादक गितेश महाराज मातोळे, किबोर्ड वादक देवा महाराज, वादक कृष्णा महाराज खांडगे व गायक तनुजा ताई घुगे, वैष्णवी ताई यांच्या साथ संगत मुळे संगीतमय मधुर श्रावण कथा ऐकावयास मिळाली. या सोहळ्याला पहिल्या दिवशी ढोल ताशांच्या गजरात हभप अंकिताताई खांडगे यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी सोहळ्याचे मार्गदर्शक राजपुरोहित विरभद्र गजानन मठपती (पिंटू महाराज), नवनाथ कांबळे व व्यवस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराज मित्र मंडळ, श्री हनुमान जन्मोत्सव समिती, श्री संतोषी माता महिला मंडळ श्री गुरुकृपा महिला मंडळ, श्री ओंकारेश्वर महिला मंडळ, श्री पार्वती महिला मंडळ, श्री स्वामी समर्थ भक्तगण सिडको-हडको नांदेड व आयोजक सर्व समाज बांधव यांनी परिश्रम घेतले.

# लोहा तालुक्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पिकांची तालुका कृषी अधिकारी कासराळे यांनी केली पाहणी



**लोहा (प्रतिनिधी)–** लोहा तालुक्यात संततधार पावसामुळे अनेक नदी, नाल्यांना, ओढ्यांना पुर आला. त्यामुळे नदी, नाला, ओढा काठावरील तसेच अनेक ठिकाणी शेतकऱ्यांच्या खरिप पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले. नदी नाला व ओढ्या काठचे पिके वाहून गेले. या सर्वच अतिवृष्टीग्रस्त पिकांची पाहणी लोहा तालुका कृषी अधिकारी पी.जी. कासराळे यांनी केली.

यावेळी मंडळ कृषी अधिकारी दशरथ शिंदे, उपकृषी अधिकारी एल.एम. हांडे, एस.के. गच्चे, सहायक कृषी अधिकारी संतोष सोनवळे, शेवडी बा.चे मा.सरपंच कैलास धोंडे, भेंडेगावचे सरपंच राजू उदगिरे, जवळाचे सरपंच माधव पावडे, नवनाथ वानखेडे व शेतकरी उपस्थित होते.

पान १ वरून...

**अतिवृष्टी व पुराच्या...**

पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत दूषित होणार नाही याची दक्षता घ्यावी. जर पावसाच्या पाण्यामुळे किंवा पुराच्या पाण्यामुळे हे स्त्रोत दूषित झाले असतील तर तातडीने स्वच्छ पिण्याच्या पाण्यासाठी पर्यायी व्यवस्था करावी पाणी ओसरल्यानंतर गावातील सगळ्या पाण्याच्या स्त्रोतांचे शुद्धीकरण करून घ्यावे.

कीटकजन्य आजार पसरू नये यासाठी गावात कुठे पाणी साचलेले राहणार नाही याची दक्षता घ्यावी त्याचबरोबर फॉगिंगडस्टिंग करून कीटकजन्य आजार टाळण्यासाठी उपाययोजना करावी.

गावात जर मृत जनावरे वाहून आली असतील तर तातडीने त्यांचे शवविच्छेदन करून शास्त्रशुध्द पद्धतीने त्यांची विल्हेवाट लावावी कुठल्याही प्रकारे मृत जनावरे गावात पडून राहतील, असे होऊ नये याबाबतची योग्य दक्षता ही घ्यायची आहे.

**मूलभूत सुविधांच्या पुनर्स्थापना**

अनेक गावांचा संपर्क पुराच्या किंवा अतिवृष्टीच्या पाण्यामुळे हा तुटलेला आहे या ठिकाणी तातडीने रस्त्यांचे किंवा पुलांच्या डागडुजीचे काम करून हा संपर्क पुनर्स्थापित होईल या दृष्टीने सर्व संबंधित यंत्रणा जसे राष्ट्रीय महामार्ग, सार्वजनिक बांधकाम विभाग सर्व विभाग, जिल्हा परिषद बांधकाम विभाग या सर्वांनी आणि मुख्यमंत्री ग्रामसडक योजना विभाग या सगळ्यांनी उपायोजना करायची आहे.

विजेचे पोल पडल्यामुळे व लाईन्सचे नुकसान झाल्यामुळे वीजपुरवठा सुद्धा अनेक ठिकाणी खंडित झाला आहे विजेच्या बाबतीत पूर्ण काळजी घेऊन महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने वीजपुरवठा लवकरात लवकर पुनर्स्थापित होईल याची दक्षता घ्यायची आहे. पाणी पुरवठा योजना जर अतिवृष्टी किंवा पुरामुळे बंद पडल्या असतील तर त्यांची दुरुस्ती करून शुद्ध पाणीपुरवठा योजनेच्या माध्यमातून लवकर सुरू करण्याची दक्षता पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणयांनी घ्यायची आहे. जलसंधारण विभाग राज्यस्तर आणि जिल्हा परिषद लघुपाटबंधारे विभाग यांच्या अनेक तलाव व जलसंधारण स्ट्रक्चर्स यांचे नुकसान झाले असेल तर त्याची डागडूजीकरून त्यातून कुठलेही मोठे नुकसान होणार नाही अशी उपाय योजना संबंधित विभागांनी तातडीने करायची आहे.

**झालेल्या नुकसानाची पाहणी व पंचनामे**

गेल्या पाच दिवसांमध्ये जिल्ह्यात उद्भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीमुळे शेतपिकांचे नुकसान, शेती खरडून गेल्यामुळे झालेले नुकसान त्याचप्रमाणे पशुधनाचे नुकसान हे मोठ्या प्रमाणावर झाले आहे अनेक ठिकाणी अतिवृष्टी व पुराच्या पाण्यामुळे घरांची मोठ्या प्रमाणावर पडझड झाली आहे व इतरही आस्थापनांचे नुकसान झालेले आहे या सगळ्यांची तातडीने पाहणी करून त्याचा अहवाल अनुदान मागणी सहित लवकरात लवकर संबंधित यंत्रणेने सादर करायचा आहे.

आपत्ती व्यवस्थापनाच्या कामांमध्ये लोकप्रतिनिधी, एनजीओ छत्रपती, समाजसेवी संस्था, सीएसआर या सर्वांशी समन्वय साधने आवश्यक आहे जेणेकरून आपत्ती व्यवस्थापनाचे काम अधिक प्रभावीपणे करता येईल आपत्ती व्यवस्थापनामध्ये लोकसहभाग मिळाल्यास अधिक तातडीने प्रतिसाद देता येतो त्या अनुषंगाने संबंधित यंत्रणांनी लोकांना सोबत घेऊन व विश्वासात घेऊन उपाययोजना कराव्यात, असे जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या सदस्यांचा दौरा

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य प्रा. मच्छिंद्रनाथ तांबे, प्रा. डॉ. गोविंद काळे व डॉ. मारुती शिकारे हे २४ व २५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत नांदेड जिल्ह्यातील गवंडी, बेलदार या जाती संदर्भात बैठक, सुनावनी कामकाजासाठी दौऱ्यावर येत आहेत.

रविवार २४ ऑगस्ट २०२५ रोजी सायं ६ वा. खाजगी वाहनाने शासकीय विश्रामगृह, नांदेड येथे आगमन व मुक्काम. सोमवार २५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११.३० ते १२.३० या वेळेत दि.१ जुलै २०२४ ते ३० जून २०२५ या कालावधीमधील इतर मागासवर्ग, विशेष मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती संवर्गास वितरीत केलेली जात प्रमाणपत्रे व जात वैधता प्रमाणपत्र यांचा आढावा तसेच जिल्ह्यातील आश्रमशाळांचा आढावा. स्थळ: जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड. दुपारी १२.३० ते १.३० या कालावधीत नांदेड जिल्ह्यातील गवंडी/बेलदार या जात समुहांच्या प्रतिनिधीशी चर्चा व सुनावनी. दुपारी १.३० वा. भोजन. दुपारी २ ते सायं. ६ वाजता बेलदार, गवंडी जात समुहाची क्षेत्रपाहणी. सायं. ७ वा. शासकीय विश्रामगृह नांदेड येथे आगमन व मुक्काम.

# अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या

## राष्ट्रवादी युवकचे जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील शिंदे यांची कृषिमंत्री दत्ता भरणे यांच्याकडे मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** गत २-३ दिवसांपासून झालेल्या अवकाळी अतिवृष्टी व बॅकवॉटर मुळे नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. खरीप हंगामातील पिके पूर्णतः पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांचे हातचे पीक नष्ट झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे. याबाबत राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील शिंदे यांनी महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री दत्ता भरणे यांना निवेदन देऊन तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना भरपाई द्यावी, अशी मागणी केली आहे.



बालाजी पाटील शिंदे यांनी निवेदनात म्हटले आहे की, नांदेड जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये शेतकरी वर्गाने कष्टाने लावलेली पिके अतिवृष्टी व बॅकवॉटरमुळे पूर्णपणे वाहून गेली आहेत. शेतकऱ्यांचे जनावरांचेही मोठे नुकसान झाले असून काही ठिकाणी जनावरांचा मृत्यू देखील झाल्याची माहिती आहे. दरम्यान, सीमावर्ती भागातील धर्माबाद, बिलोली, मुखेड, देगलूर, नायगाव तालुक्यांसह अनेक शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पाण्यामुळे पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. विशेषत: मुखेड, नायगाव व बिलोली तालुक्यातील शेतांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली असून शेतकऱ्यांच्या उपजीविकेवर मोठे संकट ओढवले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, अशी ठाम मागणी बालाजी पाटील शिंदे यांनी कृषिमंत्री दत्ता भरणे यांच्याकडे केली आहे.

CMYK

# अंतर्मन

# पितृपक्ष कधीपासून?

## तृतीया आणि चतुर्थी श्राद्ध एकाच दिवशी, श्राद्ध पक्षाच्या तारखा पहा



**पितृपक्षाचा काळ हा पूर्वजांचे स्मरण करण्यासाठी आणि त्यांची पूजा करण्यासाठी सर्वात शुभ मानला जातो. असे मानले जाते की पितृपक्षादरम्यान पितर स्वर्ग लोकातून पृथ्वीवर येतात आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना आशीर्वाद देतात. या वेळी पितृपक्ष ७ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. यावेळी तृतीया आणि चतुर्थी तिथीचे श्राद्ध एकाच दिवशी केले जाईल.**

### तिथी अन् तारखा

| | |
|---|---|
| पौर्णिमा तिथी श्राद्ध | रविवार ७ सप्टेंबर |
| प्रतिपदा तिथी श्राद्ध | सोमवार ८ सप्टेंबर |
| द्वितीया तिथी श्राद्ध | मंगळवार ९ सप्टेंबर |
| तृतीया तिथी श्राद्ध\ चतुर्थी तिथी श्राद्ध | बुधवार १० सप्टेंबर |
| भरणी तिथी आणि पंचमी तिथी श्राद्ध | गुरुवार ११ सप्टेंबर |
| षष्ठी तिथी श्राद्ध | शुक्रवार १२ सप्टेंबर |
| सप्तमी तिथी श्राद्ध | शनिवार १३ सप्टेंबर |
| अष्टमी तिथी श्राद्ध | रविवार १४ सप्टेंबर |
| नवमी तिथी श्राद्ध | सोमवार १५ सप्टेंबर |
| दशमी तिथी श्राद्ध | मंगळवार १६ सप्टेंबर |
| एकादशी तिथी श्राद्ध | बुधवार १७ सप्टेंबर |
| द्वादशी तिथी श्राद्ध | गुरुवार १८ सप्टेंबर |
| त्रयोदशी तिथी\माघ श्राद्ध | शुक्रवार १९ सप्टेंबर |
| चतुर्दशी तिथी श्राद्ध | शनिवार २० सप्टेंबर |
| सर्वपितृ अमावस्या श्राद्ध | रविवार २१ सप्टेंबर |


### या गोष्टींची विशेष काळजी घ्या

पितृपक्षात तुमचे पूर्वज ज्या तिथीला मृत्युमुखी पडले त्या तिथीनुसार श्राद्ध केले जाते. श्राद्धाच्या दिवशी, तुमच्या पूर्वजांचे आवडते अन्न तयार करा आणि या दिवशी ब्राह्मण, कावळे, गाय, मांजर आणि कुत्र्यांना खायला द्यावे. याला पंचबली म्हणतात. श्राद्धाच्या दिवशी, प्रथम तर्पण करा. तर्पणासाठी काळे तीळ, जव आणि पाणी घालून पूर्वजांना अर्घ्य अर्पण करा. तसे, श्राद्ध पक्षात दररोज तर्पण करणे खूप महत्वाचे आहे. पितृपक्षात दान करण्याचे विशेष महत्त्व आहे आणि तुम्ही कोणत्याही दिवशी दान करू शकता, परंतु ज्या दिवशी तुमच्या पूर्वजांचे श्राद्ध असेल त्या दिवशी तुम्ही निश्चितपणे दान केले पाहिजे.



## तुम्हाला काहीतरी वेगळं वाटतं, काहीतरी वेगळं घडतं...

# शिका ज्योतिषशास्त्र



**संपूर्ण विश्व ३६० अंशांमध्ये विभागले गेले आहे. यामध्ये, १२ राशींपैकी प्रत्येकाचे ३० अंश आहेत. अशा प्रकारे हे राशीचक्र संपूर्ण विश्वाचे प्रतिनिधित्व करते. सर्व ९ ग्रह प्रत्येक राशीत त्यांच्या स्वतःच्या वेगाने प्रवेश करतात आणि ३० अंश ओलांडून दुसऱ्या राशीत प्रवेश करतात. प्रत्येक ग्रहाची गती आणि राशीचक्राच्या ३० अंश ओलांडण्याची वेळ मर्यादा वेगळी आहे. ग्रहांच्या या हालचालीला संक्रमण म्हणतात.**

### चंद्र सर्वात वेगाने फिरतो

सूर्य, चंद्र, मंगळ, बुध, गुरू, शुक्र, शनि, राहू आणि केतू या नऊ ग्रहांपैकी चंद्र सर्वात वेगाने फिरतो. चंद्र एका राशीत ५४ तास (अडीच दिवस) राहतो आणि नंतर दुसऱ्या राशीत प्रवेश करतो, तर शनि एका राशीतून दुसऱ्या राशीत प्रवेश करण्यासाठी ३० महिने म्हणजे अडीच वर्षे घेतो. त्याचप्रमाणे, सूर्य साधारणपणे एका राशीतून दुसऱ्या राशीत ३० दिवसांत, मंगळ दीड महिन्यात, बुध २४ दिवसांत, गुरू १२ महिन्यांत, शुक्र २५ दिवसांत आणि राहू आणि केतू १८ महिन्यांत जातो. परंतु ग्रह वक्री, थेट आणि क्षणभंगुर असल्याने या काळात फरक आहे.

### सूर्य, चंद्र कधीही वक्री नसतात

सूर्य आणि चंद्र नेहमीच थेट असतात, ते कधीही वक्री नसतात. राहू-केतू ग्रह नेहमीच वक्री असतात. मंगळ, बुध, गुरू, शुक्र आणि शनि कधीकधी थेट गतीने फिरतात आणि नंतर वक्री होतात आणि नंतर थेट गतीकडे परत येतात. सध्या गुरू त्याच्या अति-वेगाने फिरत आहे, ज्यामुळे गुरूच्या सामान्य संक्रमणाच्या नियमांमध्ये बदल दिसून येत आहेत. ज्योतिषशास्त्रात सूर्य हा आत्म्याचा कारक मानला जातो आणि चंद्र हा मनाचा कारक मानला जातो. मंगळ हा युद्ध, शौर्य आणि नेतृत्वाचा कारक आहे, तर गुरु हा शिक्षण, अध्यात्म आणि धर्माचा प्रतिनिधी आहे. बुध हा बुद्धिमत्ता, संवाद इत्यादींचे कारण आहे, शुक्र हा सौंदर्य आणि आनंदाचा कारक आहे, तर शनि न्याय आणि शिक्षा तसेच सूडबुद्धी आणि विलंब दर्शवितो. राहू हा आळस, अस्थिरता, पोटाचे आजार आणि राजनयिकतेचा कारक आहे आणि केतू मानसिक अस्थिरता, लेखन, निराशा आणि संशोधन कार्याचा कारक आहे. प्रत्येक ग्रह कोणत्याही व्यक्तीचे किंवा वस्तूचे प्रतिनिधित्व करतो, तो त्या व्यक्तीशी संबंधित नातेसंबंध, वस्तू किंवा घटनांमध्ये चढ-उतार आणतो, म्हणून ग्रहांच्या हालचाली लक्षात घेऊन कृती करण्याचा सल्ला दिला जातो.

# कुंडलीत ग्रहणयोग कधी तयार होतो?

**भारतीय ज्योतिषशास्त्र हे केवळ ग्रहांची गणना नाही, तर ते मानवी आत्म्याच्या उदय आणि पतनाचा, त्याच्या अंतर्मनातील सूक्ष्म लहरींचा आणि त्याच्या नशिबाच्या गूढ प्रवाहाचा एक शक्तिशाली आरसा आहे. जेव्हा सूर्य आणि राहू या दिव्य ज्ञानाच्या प्रकाशात एकाच घरात असतात, तेव्हा त्या क्षणी केवळ खगोलीय घटना घडत नाहीत तर आत्म्याच्या प्रकाशावर एक अदृश्य सावली येते. हा तो क्षण आहे जेव्हा कुंडलीत ग्रहणयोग जन्माला येतो.**



### आत्मविश्वासावर गोंधळाची सावली

सूर्य हा आत्म्याचे प्रतीक आहे. तो तेज, सत्य, प्रतिष्ठा आणि आत्मसाक्षात्काराचे दिव्य प्रतीक आहे. तो जीवनाला दिशा देतो, जीवनात प्रकाश भरतो. दुसरीकडे राहू हा एक सावली आहे, रहस्य, भ्रम, कपट, इच्छा आणि अज्ञात यांच्या खोलीतून जन्मलेला ग्रह आहे. जेव्हा राहू या तेजस्वी सूर्याजवळ येतो तेव्हा हे संयोग एक अद्वितीय योग तयार करते ज्याला ग्रहणयोग म्हणतात. हे योग आत्म्याच्या सूर्यावर गोंधळाचे धुके आणते. ते तेज लपवते, दिशा अनिर्णीत करते आणि जीवनाला एका तीव्र मानसिक प्रवासात बदलते. हा योग व्यक्तीला बाह्य जगापासून वेगळे करतो आणि त्याला त्याच्या स्वतःच्या सावलीची ओळख करून देतो.

### ग्रहण योगाचा रहस्यमय प्रभाव

ज्या कुंडलीत ग्रहण योग असतो, त्या कुंडलीत व्यक्ती वारंवार त्याच्या ओळखीवर प्रश्न विचारते. तो स्वतःचा शोध घेतो, परंतु हा शोध त्याला आत घेऊन जातो, बाहेर नाही. वडिलांसोबतच्या नातेसंबंधातील गोंधळ, प्रतिष्ठेच्या क्षेत्रात अडथळे, आत्मविश्वासातील चढउतार आणि खोल मानसिक संघर्ष हे सर्व या योगाचे संभाव्य परिणाम आहेत. कधीकधी हा योग व्यक्तीला फसवणूक, ढोंग आणि बाह्य दिमाखाकडे घेऊन जातो आणि कधीकधी तो त्याला आत्म-ज्ञान, साधना आणि गूढ जाणीवेकडे प्रेरित करतो. हा योग प्रकाश आणि सावली, सत्य आणि भ्रम, आत्मा आणि अहंकार यांचा संघर्ष आहे. तो जीवनाला वरवरचे राहू देत नाही, ते एकतर ते खोलवर घेऊन जाते किंवा फसवणुकीत बुडवते.

### भावनिक परिणाम

जर ग्रहण योग चढत्या अवस्थेत असेल, तर त्या व्यक्तीचा चेहरा स्वतःच त्याच्यासाठी एक गूढ बनतो. तो प्रत्येक आरशाला प्रश्न विचारतो, हा मी आहे का? चौथ्या घरात हा योग मनाला अस्वस्थ करतो, मातृप्रेमाच्या प्रतिष्ठेवर शंका निर्माण करतो. पाचव्या घरात हा योग मुलांशी संबंधित गूढता आणि चिंता निर्माण करतो. दहाव्या घरात हा योग शक्तीशी संघर्ष करायला लावतो. व्यक्तीला उंची हवी असते पण ती शिडी पुन्हा पुन्हा हरवते. बाराव्या घरात हा योग व्यक्तीला देश, घर आणि स्वतःच्या घरापासून दूर घेऊन जातो. कदाचित काही तपश्चर्या, वनवास किंवा आत्मनिरीक्षणाकडे.

- **हा केवळ एक अशुभ योग आहे का? : नाही, जेव्हा राहू सूर्याला झाकतो तेव्हा तो केवळ अंधारच आणत नाही, तर तो व्यक्तीला बाह्य प्रकाशापासून दूर करून आतील सूर्य शोधण्यास भाग पाडतो. जो या योगाची खोली समजून घेतो तो आत्म-शोधाच्या दुर्मिळ प्रवासाला निघतो. राजकारण, तंत्र, मानसशास्त्र, गूढ विज्ञान, परदेश, संशोधन आणि रणनीती, हा योग व्यक्तीला या सर्व क्षेत्रात आश्चर्यकारक यश देऊ शकतो. परंतु हे यश सरळ रेषेत येत नाही, ते केवळ विचलितता आणि गोंधळातूनच मिळते.**
- **उपाय : विझलेला दिवा पुन्हा पेटवणे : जेव्हा एखादी व्यक्ती सूर्याला तांब्याच्या भांड्यात पाणी अर्पण करताना ओम गृहिणी सूर्याय नमः असा जप करते, तेव्हा तो बाह्य सूर्याला पेटवत नाही, तर स्वतःच्या आत विझलेला दिवा पुन्हा पेटवतो. राहूसाठी जपलेला ओम भ्रम भ्रम सह राहवे नमः हा जप माणसाला मायेच्या बंधनातून मुक्त करतो. वृद्धांची सेवा, पूर्वजांबद्दल आदर आणि स्वकेंद्रित जीवनशैली या योगाच्या शांततेत मदत करते.**

# घराच्या या दिशेला माशांचे चित्र लावा!

वास्तुशास्त्र



**लोक अनेकदा त्यांच्या घरात माशांचे चित्र लावतात. घराचे सौंदर्य वाढवण्यासोबतच वास्तुशास्त्रात ते खूप शुभ मानले जाते. असे म्हटले जाते की घरात माशाचे चित्र लावल्याने आजूबाजूच्या वातावरणातील नकारात्मक ऊर्जा निघून जाते आणि घरात नेहमीच सकारात्मक उर्जेचा प्रवाह असतो. घराच्या उजव्या भिंतीवर ते लावल्याने व्यक्तीला घरगुती त्रासांपासूनही आराम मिळतो आणि जीवनातील वाईट काळ दूर करता येतो. परंतु जर तुम्ही हे शुभ चित्र चुकीच्या ठिकाणी किंवा दिशेने लावले असेल तर त्या चित्राचा विपरीत परिणाम देखील दिसून येतो. अशा परिस्थितीत, वास्तुशास्त्रानुसार घराच्या कोणत्या भागात माशाचे चित्र लावणे शुभ आहे आणि त्यातून कोणते फायदे मिळतात हे जाणून घेऊया...**

### योग्य दिशेने चित्राचे फायदे

वास्तुशास्त्रानुसार, योग्य दिशेने माशांचे चित्र लावण्याने व्यक्ती घरातील आर्थिक समस्यांपासून मुक्त होऊ शकते आणि हळूहळू पैसे मिळण्याची शक्यता निर्माण होऊ लागते. असे मानले जाते की जर एखाद्या व्यक्तीने वास्तुच्या सर्व नियमांचे पालन करून माशाचे चित्र लावले तर त्याच्या घरात नेहमीच सुख, शांती आणि समृद्धी टिकून राहते. यामुळे कुटुंबातील सदस्यांना जीवनात आणि करिअरमध्ये प्रगती मिळते. तसेच, नशीब नेहमीच त्याच्यासोबत राहते आणि घरात सौभाग्य येते. हे एक चित्र घरात लावल्याने कुटुंबात आनंदी वातावरण राहते आणि मानसिक शांती देखील जाणवते.

### घरात माशांचे चित्र लावण्यासाठी वास्तु नियम

- वास्तुनुसार, घरातील अशा ठिकाणी कधीही माशांचे चित्र लावू नये जिथे घाण असेल. असे केल्याने अशुभ परिणाम होऊ शकतात.
- स्वयंपाकघर, बाथरूम किंवा शौचालयाजवळील भिंतीवर माशांचे चित्र लावण्यासही मनाई आहे. असे केल्याने घरात नकारात्मकता येऊ शकते.
- घरात कधीही माशांचे असे चित्र लावू नये ज्यामध्ये मासे अस्पष्ट दिसत असतील किंवा कुठूनतरी चित्र तुटलेले असेल. असा फोटो लावणे शुभ मानले जात नाही.
- वास्तुनुसार, माशांच्या चित्राच्या पार्श्वभूमीवर देखील विशेष लक्ष दिले पाहिजे. कधीही असे चित्र लावू नये ज्यामध्ये वादळ किंवा पाण्यात खूप गोंधळ दिसत असेल.

- घरात माशांचे असे चित्र लावा : असे मानले जाते की माशांचे असे चित्र ज्यात ते फिरताना दिसतात ते घरात लावावे. पार्श्वभूमी देखील सकारात्मक असावी. वास्तुनुसार, घरात कोई आणि सोनेरी माशाचे चित्र लावणे खूप शुभ मानले जाते. असे केल्याने घरात संतुलन आणि प्रेम नेहमीच राहते. तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही तुमच्या घराच्या बैठकीच्या खोलीत माशाचे चित्र लावू शकता. असे केल्याने व्यक्ती आर्थिक संकटातूनही मुक्त होऊ शकते.
- या दिशेने माशाचे चित्र लावा : असे मानले जाते की घरात माशाचे चित्र योग्य दिशेने लावणे खूप महत्वाचे आहे. असे न केल्याने त्याचा विपरीत परिणाम घरात दिसून येतो. वास्तुशास्त्रानुसार, माशाचे चित्र नेहमी घराच्या ईशान्य दिशेने म्हणजेच ईशान कोन येथे लावावे. याशिवाय, तुम्ही ते उत्तर दिशेने देखील ठेवू शकता. या दिशांना रंगकामासाठी सर्वोत्तम मानले जाते. या दिशेने माशाचे चित्र लावल्याने घरात सकारात्मक ऊर्जा येते आणि नकारात्मकता दूर राहते.

# घराच्या या दिशेला झेंडूचे रोप लावा

## तुमची बॅग धनाने भरून जाईल, तुमची प्रगती होईल

**हिंदू धर्मात पिवळ्या आणि नारंगी झेंडूच्या फुलांचे विशेष महत्त्व आहे. ते विशेषतः देवदेवतांच्या पूजेमध्ये आणि धार्मिक कार्यात वापरले जाते. पिवळ्या झेंडूची फुले अगदी सूर्योदयाच्या रंगासारखी दिसतात. त्याचबरोबर केशरी रंगाची झेंडूची फुले सूर्यास्ताचे प्रतीक आहेत. ही फुले भगवान विष्णू आणि माता लक्ष्मीला खूप प्रिय आहेत. अशा परिस्थितीत, वास्तुशास्त्रातही झेंडूच्या फुलांना विशेष महत्त्व आहे. घरात लावल्याने सकारात्मक ऊर्जा प्रसारित होते आणि संपत्ती आणि धान्य देखील मिळते. अशा परिस्थितीत, वास्तुनुसार झेंडूची फुले कोणत्या दिशेने लावावीत आणि त्याचे फायदे काय आहेत ते जाणून घेऊया...**

### झेंडूची फुले योग्य दिशेने लावण्याचे फायदे

असे मानले जाते की घरात योग्य ठिकाणी झेंडूची फुले ठेवल्याने नकारात्मक ऊर्जा दूर राहते. त्याचा मनमोहक सुगंध आजूबाजूचे वातावरण सकारात्मक बनवतो. जर तुम्ही घरात योग्य दिशेने झेंडूची फुले लावली तर माता लक्ष्मी आणि भगवान विष्णूचा आशीर्वाद मिळू शकतो. घरात नेहमीच सुख, समृद्धी आणि शांती राहते. या फुलांचा वापर पूजेमध्येही करावा. असे केल्याने तुमची पैशाची कमतरता दूर होऊ शकते आणि पैशाचे फायदे निर्माण होऊ लागतात. घरात झेंडूची फुले लावल्याने कुटुंबातील वातावरण आल्हाददायक राहते आणि जीवनात प्रगतीचे नवीन मार्गही उघडू लागतात.

### झेंडूच्या रोपाचे विशेष वास्तु नियम

- घराच्या मुख्य प्रवेशद्वारावर हे शुभ रोप लावणे देखील खूप शुभ मानले जाते. असे केल्याने नकारात्मक ऊर्जा घरात प्रवेश करू शकत नाही.
- वास्तुशास्त्रानुसार, झेंडूचे रोप कधीही घराच्या दक्षिण किंवा पश्चिम दिशेला लावू नये. असे केल्याने अशुभ परिणाम होऊ शकतात.
- झेंडूचे फूल घाणेरड्या जागी, स्वयंपाकघर, बाथरूम आणि शौचालयाजवळ चुकूनही ठेवू नये. या ठिकाणी झेंडूचे रोप ठेवणे शुभ मानले जात नाही.
- घरात कधीही असे झेंडूचा रोप ठेवू नका जे पूर्णपणे सुकले असेल किंवा त्याची फुले आणि पाने सुकत असतील. तसेच, झाड हिरवेगार ठेवण्याची काळजी घेतली पाहिजे.
- झेंडूच्या फुलांची माळ बनवून ती देव-देवतांना अर्पण करावी. असे केल्याने व्यक्तीला देवाकडून विशेष आशीर्वाद मिळू शकतात.

### घराच्या या दिशेने झेंडूची फुले लावा

वास्तुशास्त्रानुसार घराच्या योग्य दिशेने झेंडूची फुले लावणे खूप महत्वाचे आहे. जर तुम्ही ते चुकीच्या ठिकाणी किंवा दिशेने ठेवले तर त्याचे अशुभ परिणाम होऊ शकतात. वास्तुशास्त्रानुसार, झेंडूच्या फुलांचे रोप नेहमी ईशान्य दिशेला लावावे. याशिवाय, तुम्ही हे शुभ रोप पूर्व किंवा उत्तर दिशेला देखील लावू शकता. असे केल्याने घरातून नकारात्मक ऊर्जा दूर होते आणि त्याच्या जागी सकारात्मक ऊर्जा प्रसारित होते. तसेच, या रोपामुळे आजूबाजूचे वातावरण देखील शुद्ध होते.

# महाराष्ट्राचा देशाच्या योगदानात मोठा वाटा : केंद्रीय शिक्षण सचिव संजय कुमार

**नवी दिल्ली–**महाराष्ट्रात रुजलेली संत परंपरा सामाजिक, सांस्कृतिक अभिसरणामुळे राज्याने देशाच्या योगदानात महत्त्वपूर्ण वाटा उचलला यापुढेही नवनियुक्त उमेदवारांकडून तीच अपेक्षा केली जाईल असे प्रतिपादन केंद्रीय शिक्षण विभागाचे सचिव संजय कुमार यांनी मराठी पाऊलतर्फे वर्ष २०२४ मध्ये नागरी सेवा परीक्षेत राज्यातून उत्तीर्ण झालेल्या गुणवंतांच्या सत्कार सोहळ्यात केले.

भरगच्च झालेला एन.डी.एम.सी. कन्व्हेन्शन हॉलमध्ये बुधवारी रात्री उशिरापर्यंत हा सत्कार सोहळा चालला. त्यावेळी श्री संजय कुमार बोलत होते. या कार्यक्रमात जवळपास ४० नवनियुक्त अधिकाऱ्यांचा मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास त्या काळात नागरी सेवा देऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना नवनियुक्त उमेदवारांकडून मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले.



या कार्यक्रमास ज्ञानप्रबोधिनी संस्थेचे विवेक कुलकर्णी आणि सविताताई कुलकर्णी, तसेच एस.एस.बी.चे अतिरिक्त महासंचालक अनुपमा चंद्रा व सी.आय.एस.एफ. चे अतिरिक्त महासंचालक पद्माकर रणपिसे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यासह माजी सनदी अधिकारी ज्ञानेश्वर मुळे, केंद्रीय शिक्षण खात्याचे संयुक्त सचिव आनंद पाटील, लँड पोर्ट प्राधिकरणाच्या वित्त सदस्य रेखा रायकर, म हाराष्ट्र सदनच्या निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला, सुशील गायकवाड यांच्यावर उपस्थित होते.

संजय कुमार पुढे म्हणाले महाराष्ट्र देशासाठी नेहमीच मार्गदर्शक कार्य करत राहिलेला आहे. पुढचे पाऊल ज्या पद्धतीने राज्यातील मुलांच्या पाठीशी राजधानीत कार्यरत आहे ते कौतुकास्पद आहे. इतर राज्यांनीही प्रेरणा घेतली पाहिजे. भारतीय नागरी सेवेची परीक्षा उत्तीर्ण करणं हे एक जिद्दीचे काम असून यामुळे खऱ्या अर्थाने भारत ओळखण्यास मदत होते. उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचे कौतुक करून देशाच्या विकासात सकारात्मक योगदान द्यावे अशा अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

सीआयएसएफचे अतिरिक्त महासंचालक पद्माकर रणपिसे यांनी भविष्यात नागरी सेवेत इच्छुक असणाऱ्या उमेदवारांनी आरोग्यकडे दुर्लक्ष न करणे, पेहरावा नीट निटका असणे असा सल्ला दिला. सेवेत आलेल्या नवनियुक्त अधिकाऱ्यांना आपल्या स्वभावात सहजता आणण्याच्या सूचना केला. तसेच महाराष्ट्राचे आराध्य दैवत शिवाजी महाराज यांचा आदर्श सदैव बाळगावा, असेही नमूद केले.

# क्रीडा दिनानिमित क्रीडा महोत्सवाचे राज्यभर आयोजन

**मुंबई–**क्रीडा दिनानिमित्त आयोजित तीन दिवसीय म होत्सवात राज्यभर विविध कार्यक्रम यशस्वीरित्या राबविण्यासाठी कार्यप्रणाली तयार करण्यात यावी. त्यासाठीचा निधी तत्काळ उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती क्रीडा मंत्री ड.माणिकराव कोकाटे यांनी दिली.

पद्मभूषण मेजर ध्यानचंद सिंह यांच्या जन्मदिनानिमित्त राज्यभर २९ ते ३१ ऑगस्ट दरम्यान क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. या महोत्सवाच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीस अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, आयुक्त शितल तेली, उपसचिव सुनील पांढरे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते तसेच दूरदृष्य प्रणालीद्वारे राज्यातील क्रीडा अधिकारी सहभागी झाले होते.

मंत्री ड.कोकाटे म्हणाले की, केंद्र सरकारच्या क्रीडा धोरणाच्या धर्तीवर नवे क्रीडा धोरण तयार करण्यात यावे. तसेच राज्यातील खेळाडूंच्या अपेक्षेप्रमाणे बदल करावे. क्रीडा म होत्सवात जिल्हा तसे तालुकास्तरावर विविध क्रीडा कार्यक्रमांचे आणि स्पर्धांचे आयोजन करावे. शाळा महाविद्यालय विद्यापीठांना तसेच जिल्ह्यातील क्रीडापटूंना या म होत्सवात सहभागी करून घ्यावे. केंद्र शासनाने दिलेल्या सूचनाप्रमाणे २९ ऑगस्ट रोजी मेजर ध्यानचंद यांना अभिवादन, फिट इंडिया शपथ आणि ६० मिनिटे संघ खेळ व विरंगुळ्याचे खेळ आयोजित करावे.

# यशवंतराव चव्हाण पंचायत राज अभियानांतर्गत गुणवंतांचा गौरव



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** – प्रामाणिकपणे, जबाबदारीने आणि कार्यतत्परतेने काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव हा इतरांसाठी प्रेरणादायी ठरतो, असे प्रतिपादन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले.

यशवंतराव चव्हाण पंचायत राज अभियानांतर्गत गुणवंत अधिकारी-कर्मचारी तसेच आदर्श ग्रामविकास अधिकारी व ग्राम सेवकांचा सन्मान सोहळा विभागीय आयुक्त कार्यालयात पार पडला. या कार्यक्रमात विभागीय आयुक्त पापळकर यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाला आस्थापना विभागाचे अपर आयुक्त राजेंद्र अहिरे, गटविकास अधिकारी राजेंद्र महाजन, कक्ष अधिकारी मिलिंद म्हस्के, दिलीप भूमरे, अनिल टेकाळे, श्रीमती सुवर्णा शिदे यांच्यासह अधिकारी-कर्मचारी व पुरस्कार विजेत्यांचे नातेवाईक उपस्थित होते.

**गुणवंत अधिकारी-कर्मचारी सन्मानित**

मिलिंद पाराजीराव तुरूकमारे विस्तार अधिकारी, जिल्हा परिषद बीड, सुनील शिवाजीराव नवले सहायक प्रशासन अधिकारी, जिल्हा परिषद बीड, मनोजकुमार मोहनराव येरोळे सहायक लेखाधिकारी, जिल्हा परिषद लातूर, मन्मथ धोंडिबा मुक्तापुरे कृषी अधिकारी, जिल्हा परिषद लातूर, सचिन वैजनाथ काडवादे कनिष्ठ प्रशासन अधिकारी, जिल्हा परिषद लातूर, आदर्श ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक सन्मानित, श्रीमती शितल त्र्यंबकराव उमप ग्रामसेवक, पोखरी (संभाजीनगर), नंदकिशोर विनायकराव वानखेडे ग्रामविकास अधिकारी, जालना, सुखदेव देवसिंग शेळके ग्रामविकास अधिकारी, जालना, मधुकर मानसिंग मोरे ग्रामसेवक, नांदेड, कु. पुष्पा बालासाहेब काळे ग्रामसेवक, परभणी, विजयसिंह विलासराव नलावडे ग्राम विकास अधिकारी, धाराशिव, धनंजय रामराव

# अंत्यविधी उरकून परतताना भीषण अपघात, महिलेचा मृत्यू, १३ जण गंभीर

**इंदापूरः** इंदापूर तालुक्यातील मौजे लोणी देवकर गावच्या हद्दीत पुणे - सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर गुरुवारी (२१ ऑगस्ट २०२५) पहाटे भीषण अपघात घडला. या अपघातात कर्नाटकातील ५० वर्षीय महिला यल्लावा चौंडकी यांचा मृत्यू झाला असून, १३ प्रवासी गंभीर आणि किरकोळ जखमी झाले आहेत. क्लुझर वाहनाने सम ोरील अज्ञात वाहनाला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडल्याची प्राथमिक माहिती आहे. या धडकेमुळे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि अपघात घडल्याची माहिती आहे.

या अपघाताची माहिती मि ळताच इंदापूर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तात्काळ उपचारासाठी इंदापूर येथील शासकीय रुग्णालय, किटीकेअर हॉस्पिटल आणि भिगवण येथील लाईफलाईन हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले.

## नगरपरिषद भोकर
## जाहीर प्रगटन
**(नाव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, संभाजी कोंडबाजी फोले यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-- गट.नं.-५९३ जुना वार्ड नं.-०५ मधील प्लॉट नंबर - मालमत्ता नं.- नवीन डी.७७४/४, नवीन वार्ड नं.-०१, नवीन मालमत्ता नं. -४०१०/२७, साईज पूर्व पश्चिम- १३.१९ मीटर. दक्षिण उत्तर-९.१४ मीटर. चुर्तसिमा- पूर्वेस -६.१० मीटरचा रस्ता, पश्चिमेस: गट नं. ५१३, दक्षिणेस : प्लॉट नं. ३, उत्तरेस : ६.१० चा मीटरचा रस्ता. श्री परशुराम जीवनाजी चित्ताकुरे यांच्या नावे नावाने असलेली मालमत्ता खरेदीखता आधारे/वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे. या संबंधी कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधितांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे. मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणाचेही उत्तर ऐकून घेतले जाणार नाहीत.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर
## जाहीर प्रगटन
**(नाव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सरस्वती संजय पवार यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-- गट.नं.-४८४ जुना वार्ड नं.-०५ मधील प्लॉट नंबर - मालमत्ता नं.- एस.-१६१, नवीन वार्ड नं.-१०, नवीन मालमत्ता नं. - २३८१, साईज पूर्व पश्चिम-१२.१९ मीटर. दक्षिण उत्तर-४.५७ मीटर. चुर्तसिमा- पूर्वेस -प्लॉट नं. ४४, पश्चिमेस: १० मीटरचा रस्ता, दक्षिणेस : प्लॉट नं. ४२ मीटर, उत्तरेस : सदरील प्लॉटपैकी सुरेश मुंदडा. श्री श्री प्रकाश भिक्खू जाधव यांच्या नावे नावाने असलेली मालमत्ता खरेदीखता आधारे/ वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे. या संबंधी कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधितांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे. मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणाचेही उत्तर ऐकून घेतले जाणार नाहीत.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर
## जाहीर प्रगटन
**(नाव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, गंगाबाई शंकरराव बच्चेवाड व इतर यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-- गट.नं.-१३३ जुना वार्ड नं.-मधील प्लॉट नंबर -४८ मालमत्ता नं.-नवीन वार्ड नं.- नवीन मालमत्ता नं. - साईज पूर्व पश्चिम-९.१४ मीटर. दक्षिण उत्तर-१२.१९ मीटर. चुर्तसिमा- पूर्वेस -सा. बां. विभाग, पश्चिमेस: प्लॉट नं. ४७, दक्षिणेस : ६.१० मीटर रस्ता, उत्तर : प्लॉट नंबर ४९. श्री शंकर पिराजी बच्चेवाड यांच्या नावे नावाने असलेली मालमत्ता खरेदीखता आधारे/ वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे. या संबंधी कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधितांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे. मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणाचेही उत्तर ऐकून घेतले जाणार नाहीत.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर
## जाहीर प्रगटन
**(नाव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्री आकाश दिगंबर आडे यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-- गट.नं.-३९९ जुना वार्ड नं.-३ मधील प्लॉट नंबर -३ मालमत्ता नं.-G-144/130 नविन वार्ड नं.-१० नवीन मालमत्ता नं. - २८३१/८७ साईज पूर्व पश्चिम-३० फुट. दक्षिण उत्तर-४० फुट, चुर्तसिमा- पूर्वेस -रिकामी जागा, पश्चिमेस: रस्ता, दक्षिणेस : रस्ता, उत्तर :प्लॉट नबर २०४ श्री मोहम्मद खैसरोद्दीन मोहम्मद ताजोद्दीन यांच्या नावे नावाने असलेली मालमत्ता खरेदीखता आधारे/ वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे. या संबंधी कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधितांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्धा झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे. मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणाचेही उत्तर ऐकून घेतले जाणार नाहीत.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## टी.सी.हरवली

माझी रोहित नामदेव भगत या नावाची इयत्ता १० वी पासची टी. सी. भावसार चौक ते तरोडा नाका नांदेड दरम्यान ऑटो प्रवासात हरवली आहे.कोणास सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

**संपर्क–रोहित नामदेव भगत रा. नांदेड**
मो.९५११९२७८५८

## टी.सी.हरवली

माझी रुपाली संतोष गवळे या नावाची इयत्ता १० वी पासची टीसी मुखेड ते नांदेड प्रवास करत असताना हरवली आहे.कोणास सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावे.

**संपर्क–रुपाली संतोष गवळे**
मु. पो.मेथी ता.मुखेड जि.नांदेड
मो.७७९८७७५६३४

## टी.सी.हरवली

माझी राठोड वर्षा प्रभाकर या नावाची इयत्ता आठवी पास ची टि.सी गंगाखेड ते नांदेड बस प्रवासात हरवली आहे.कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा. -संपर्क- राठोड वर्षा प्रभाकर रा. मु. बेलवाडी तांडा पो. घटंगरा ता. गंगाखेड जि. परभणी मो. ९७६३२७३८४२

## टी.सी.हरवली

माझी फातेमा खानम अ. रहेमान खान या नावाची इयत्ता १२ पासची टी. सी. व इतर कागदपत्रं नांदेड ते नायगाव बस प्रवासात हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा. योग्य ते बक्षीस देण्यात येईल.

–संपर्क–फातेमा खानम अ. रहेमान खान देगलूर नाका, नांदेड मो. ८२७५२०५०२९

**खुश खबर खुश खबर खुश खबर**

## प्रवेश देणे चालू आहे
**(सरकार मान्य)**
**नॅशनल औद्योगिक प्रशिक्षण संस्था**

माळटेकडी रेल्वेफ्लाय ओहरजवळ नांदेड या संस्थेत Electrician, Wireman, MMV, FITTAR & Welder या व्यवसायात प्रवेश देणे चालू आहे. दिनांक २५/८/२०२५ पासून समुपदेशन फेरी सुरू होत आहे. गरजूंनी त्वरित संस्थेशी संपर्क साधावा व या संधीचा लाभ घ्यावा. संपर्क- ९०२८९८२४५१, ७६२००७६०२४

## Change In Name

My old Name is SAYYED ISMAIEL Which now I am Changing as New Name SAYED ISMAIL AHMED HUSSAIN Hence, forth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.

Address- S/O AHMED HUSSAIN GANI COLONY, NEAR ROYAL ROSE FUCTION HALL, NANDED- TARODA Bk, NANDED MAHARASTRA-431605 Mo. No. 8087519123




## Change In Name

My old Name is FIRDAUS KHAN HAMEEDULLAH KHAN Which now I am Changing as New Name FIRDOS KHAN HAMEEDULLAH KHAN Hence, forth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.

Address-LABOURCOLONEY,NANDED-H. No. 63 BLOCK NO. 5 NEAR CHABIWALA NANDED MO. NO. 9860011791

## Change In Name

My old Name is RAHIM KHA AHEMED KHA PATHAN Which now I am Changing as New Name RAHIM KHAN AHEMAD KHAN PATHAN Hence, forth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.

Address- MASJIJAVAL, SAILANI NAGAR, NANDED-431605

Mo. No. 9665599964

## Change In Name

My old Name is SHAIKH ASIF SHAIKH SHRIF Which now I am Changing as New Name MOHOMAD ASIF SHAIKH SHARIF Hence, forth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.

Address- MASJIJAVAL, DARWESH NAGAR, NANDED-431605

Mo. No. 8830404514

## Change In Name

My old Name is SHAIKH SHAHED SHAIKH SALIM Which now I am Changing as New Name SHAIKH SHAHED S/O SHAIKH SALEEM Hence, forth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.

Address- 7-765/1, ISLAMPURA DEGLOOR NAKA ITWARA, NANDED - 431604 MAHARASTRA

Mo. No. 9834775334.

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी बिलोली ता. बिलोली यांचे कार्यालय**
**प्रकरण : जन्म नोंद घेणे बाबत.**
**अर्ज आवक क्र. ३४५४/२०२५**

## जाहीर प्रगटन

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यास येते कि, अर्जदार नामे श्रीमती मिनाबाई भ. राजेश वाघमारे, वय ३६ धंदा घरकाम रा. रामतीर्थ ता. बिलोली यांनी या कार्यालयात हजर राहून जन्म मुत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधिल कलम ११( २ ) व (३) अन्वये दि. २२/०७/२०२५ रोजी जन्म नोंद घेण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार श्रीमती मिनाबाई भ. राजेश वाघमारे, रा. रामतीर्थ ता. बिलोली यांची मुलगी नामे कु. रसिका पि. राजेश वाघमारे, यांचा जन्म दि. ०४/०९/२०१० रोजीची नोंद ग्रामपंचायत कार्यालय राम तीर्थ ता बिलोली जि.नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबधितास कळविण्यात येते कि, नामे कु. रोशन पि. राजेश वाघमारे, यांच्या जन्माची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाले पासुन पंधरा दिवसात या न्यायालयात स्वतः किंवा वकीला मार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहीत कालावधीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल.

आज दिनांक १४/०८/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर प्रगटण प्रसिध्द करण्यात येत आहे.

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**बिलोली**

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी बिलोली, ता. बिलोली यांचे कार्यालय**
**प्रकरण : जन्म नोंद घेणे बाबत**
अर्ज/आवक क्र.३१८१/२०२५

## जाहीर प्रगटन

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यास येते कि, अर्जदार नामे श्री. ज्ञानेश्वर पि. गंगाराम कुडकेकर, वय ४७ धंदा शेती रा. बाभळी (आ) ता. बिलोली यांनी या कार्यालयात हजर राहून जन्म मुत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधिल कलम ११ (२) व (३) अन्वये दि. ०९/०७/२०२५ रोजी जन्म नोंद घेण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार नामे श्री.ज्ञानेश्वर पि. गंगाराम कुडकेकर, रा. बाभळी (आ) ता. बिलोली यांचा मुलगा ना गंगाकिशन पि. ज्ञानेश्वर कुडकेकर, यांचा जन्म दि. २८/१२/२००८ रोजीची नोंद ग्रामपंचायत कार्यालय बाभळी (आ) ता बिलोली जि.नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबधितास कळविण्यात येते कि, नामै कु. गंगाकिशन पि. ज्ञानेश्वर कुडकेकर, यांच्या जन्माची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाले पासुन पंधरा दिवसात या न्यायालयात स्वतः किंवा वकीला मार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहीत कालावधीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल.

आज दिनांक १४/०८/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर प्रगटण प्रसिध्द करण्यात येत आहे.

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**बिलोली**

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी बिलोली ता. बिलोली यांचे कार्यालय**
**प्रकरण जन्म नोंद घेणे बाबत.**
**अर्ज/आवक क्र.३१८०/२०२५**

## जाहीर प्रगटन

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यास येते कि, अर्जदार नामे श्रीमती श्री. प्रकाश पि. सायलु मिरदोडे, वय २० धंदा शेती रा. कुंभार गल्ली बिलोली ता. बिलोली यांनी या कार्यालयात हजर राहून जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधिल कलम ११ (२) व (३) अन्वये दि. ०९/०७/२०२५ रोजी मृत्यु नोंद आदेश मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार नामे श्रीमती श्री. प्रकाश पि. सायलु मिरदोडे, रा. बिलोली ता. बिलोली यांचे मयत आई नामे लक्ष्मीबाई भ्र.सायलु मिरदोडे, यांचा मुत्यु दि. २२/१०/२०२३ रोजी झाला असुन मुत्युची नोंद मुख्याधिकारी, नगर परिषद बिलोली ता बिलोली जि.नांदेड येथे अभिलेख मध्ये उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबधितास कळविण्यात येते कि, नामे श्रीमती लक्ष्मीबाई भ्र. सायलु मिरदोडे, यांच्या मुत्युची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाले पासुन पंधरा दिवसात या न्यायालयात स्वतः किंवा वकीला मार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहीत कालावधीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल.

आज दिनांक १४/०८/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर प्रगटण प्रसिध्द करण्यात येत आहे.

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**बिलोली**

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी बिलोली ता. बिलोली यांचे कार्यालय**
**प्रकरण : जन्म नोंद घेणे बाबत.**
**अर्ज/ आवक क्र. ३४५२/२०२५**

## जाहीर प्रगटन

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यास येते कि, अर्जदार नामे श्रीमती मीनाबाई अ. राजेश वाघमारे, वय ३६ धंदा घरकाम रा. रामतीर्थ ता. बिलोली यांनी या कार्यालयात हजर राहून जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधिल कलम ११ (२) व (३) अन्वये दि. २२/०७/२०२५ रोजी जन्म नोंद घेण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार श्रीमती मिनाबाई भ. राजेश वाघमारे, रा. रामतीर्थ ता. बिलोली यांची मुलगी नामे कु. रोशन पि. राजेश वाघमारे यांचा जन्म दि. ०८/०८/२००८ रोजीची नोंद ग्रामपंचायत कार्यालय रामतीर्थ ता बिलोली जि. नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबधितास कळविण्यात येते कि, नामे कु. रोशन पि. राजेश वाघमारे यांच्या जन्माची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाले पासुन पंधरा दिवसात या न्यायालयात स्वतः किंवा वकीला मार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहीत कालावधीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल.

आज दिनांक १४/०८/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर प्रगटण प्रसिध्द करण्यात येत आहे.

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**बिलोली**

**रामबान ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
**सेवा क्लिनीक**
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७११७०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308




## ओला दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीसाठी संभाजी ब्रिग्रेडचे थाली नाद आंदोलन



**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. या नुकसानीमुळे शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्यात ओला दुष्काळ जाहीर करून नुकसानग्रस्तांना सरसकट हेक्टरी ५० हजार रुपयांप्रमाणे नुकसान भरपाई द्या, तसेच कांदा, सोयाबीन, कापूस व इतर शेतमालाबाबत तत्काळ उत्पादन खर्चाचा विचार करून हमभाव देण्याच्या मागणीसाठी संभाजी ब्रिगेडच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांसमोर थाली नाद आंदोलन करण्यात आले.

जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात शेतकरी कर्जमाफी, ऊस, कांदा, कापूस व दूध दर, मराठा, धनगर व इतर आरक्षण, निवडणुका बॅलेट पेपरवर घेणे आणि अतिवृष्टी झाल्याने ओला दुष्काळ जाहीर करत शेतकऱ्यांच्या सन्मानार्थ हेक्टरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई तत्काळ द्या आदी मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी संभाजी ब्रिगेडच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर गुरुवार, दि. २१ आगस्ट रोजी थाली नाद आंदोलन करण्यात आले.

राज्यात मराठा, धनगर व इतर काही जात समूह आरक्षणाची मागणी करत आहे. मराठा समाजाला आरक्षणाचा संवैधानिक हक्क म्हणजे ओबीसीत समावेश करावा. धनगर समाजाचा एस.टी. मध्ये समावेश करावा, ओबीसी व इतर असा जातीय संघर्ष व तेढ निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी, असेही आंदोलनकर्त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

राज्यात प्रचंड अतिवृष्टी झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असल्याने राज्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तत्काळ सरसकट हेक्टरी ५० हजार रुपयांप्रमाणे नुकसान भरपाई द्यावी तसेच कांदा, सोयाबीन, कापूस व इतर शेतमाला बाबत तात्काळ उत्पादन खर्चाचा विचार करून हमीभाव जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा.

आगामी काळात महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. या पार्श्वभूमीवर निवडणुका बॅलेट पेपरवरच घेण्यात याव्यात, निवडणूक आयोगाने व्हीव्हीपॅट लावणार नसल्याचे जाहीर केले असून, सध्या देशभर ईव्हीएमबाबत संशयाचे वातावरण असल्याने बॅलेट पेपरवरच या निवडणुका घ्याव्यात आदी मागण्यांच्या संदर्भात सरकारचे लक्ष वेधण्यासाठी संभाजी ब्रिगेडच्यावतीने नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर थाली नाद आंदोलन करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी यांच्या– मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले. यावेळी संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष संकेत पाटील, विभागीय कार्याध्यक्ष भगवान कदम, लोकसभा अध्यक्ष परमेश्वर पाटील, संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष सुभाष कोल्हे, जिल्हाध्यक्ष कमलेश कदम आदींसह अनेकांची उपस्थिती होती.

## सततच्या पावसामुळे कपाशी पिकावर मर : प्रतिबंधात्मक व्यवस्थापनासाठी तातडीचा सल्ला

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र तथा मराठवाडा विभागामध्ये कापूस लागवडीच्या भागात मागील आठ–दहा दिवसांपासून सततचा पाऊस पडत आहे. तसेच काही भागात अतिवृष्टी झाली आहे. ज्या भागात पाऊस झाला आहे तिथल्या जमिनीवर बराच काळ पाणी साचलेले दिसत आहे. या परिस्थितीमुळे इतर खरीप पिकांसोबतच कापूस पिकाचे सुद्धा नुकसान झाल्याचे दिसत आहे. जास्त पाऊस झालेल्या शेतामध्ये दीर्घ काळापर्यंत पाणी साचून राहिल्यास त्याचा कापूस उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो. मागील आठवड्यात झालेल्या सततच्या पावसामुळे कापूस पिकामध्ये पाणी साचल्या–मुळे कापसाच्या झाडाची पाने मलूल होऊन झाडांनी मान टाकल्यासारखी लक्षणे दिसत आहेत.

ही आकस्मिक मर विकृती असून यामुळे प्रादुर्भावग्रस्त झाडे पूर्णत: वाळण्याची शक्यता असते. जमिनीत वाफसा नसल्यामुळे आकस्मिक मर प्रादुर्भावग्रस्त झाडांमध्ये मुळाद्वारे अन्नद्रव्ये शोषण होत नाही. त्यामुळे झाडे कोमेजून जतात. पाऊस पडल्यानंतर ३६–४८ तासांत आकस्मिक मरची लक्षणे दिसू लागतात. सुकल्यानंतर पानगळ होऊन कालांतराने झाडे मरतात त्यामुळे उत्पादनात मोठे नुकसान होऊ शकते. सततचा व मोठा पाऊस आणि जमिनीत वाफसा नसणे व हवेतील आर्द्रता जास्त झाल्यामुळे अशा प्रकारची लक्षणे दिसतात. तसेच सततच्या पावसाम ुळे जमिनीमध्ये वाफसा परिस्थिती नसल्यामुळे कापसाच्या मुळामध्ये बुरशीची वाढ होऊन रसवाहिनी बंद होऊ शकतात. यालाच बुरशीजन्य मर असे म्हणतात. त्यामुळे कापूस पिकावर अशा प्रकारची आक–स्मिक मर विकृती किंवा बुरशीजन्य मर रोगाची लक्षणे दिसून आल्यास पुढीलप्रमाणे व्यवस्थापन करण्याचा सल्ला कापूस संशोधन केंद्र, नांदेड, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ, परभणी येथून देण्यात आला आहे.

## युवा ग्रुपच्यावतीने आज दहीहंडीचे आयोजन

### गौतमी पाटील यांची उपस्थिती



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** युवा ग्रुप आयोजित सतीश बसवदे मित्र मंडळाच्या वतीने शुक्रवार, दि. २२ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता हडको येथील मैदानावर दहीहंडीचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात खा. अशोकराव चव्हाण यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. नृत्य कलाकार गौतमी पाटील हे या दहीहंडी महोत्सवाला हजार राहणार आहेत.

सिडको–हडको परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील युवा ग्रुपच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्रातील प्रसिद्ध नृत्यांगना गौतमी पाटील यांच्या कार्यक्रमाचे आयोजन हडको येथील मैदानावर करण्यात आले आहे.

या दहीहंडी महोत्सवात जवळपास मराठवाड्यातील व विदर्भातील नामांकित आठ संघांनी नोंदणी केली असून, या सोहळ्याचे उद्‌घाटन माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून खा. डॉ. अजित गोपछडे, मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे, मार्गदर्शक तथा नांदेड भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष माजी आमदार अमर राजूरकर यांच्यासह माजी आमदार डी.पी. सावंत, नांदेड ग्रामीण जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे, किशोर देशमुख, भाजपा महानगर उपाध्यक्ष संजय पाटील घोगरे, नगरसेवक प्रतिनिधी उदय देशमुख, नगरसेवक राजू पाटील काळे, राजू गोरे, माजी नगरसेविका डॉ. ललिता शिंदे, माजी नगरसेवक सिध्दार्थ गायकवाड, संजय इंगेवाड, नवनाथ कांबळे यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

या दहीहंडी महोत्सवाला उपस्थित राहावे, असे आवाहन युवा ग्रुपचे अध्यक्ष सतिश बसवदे व पदाधिकारी यांनी केले.

## डॉ. बबन जोगदंड यांची बार्टीत नियुक्ती



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेडचे भूमिपुत्र तथा यशदा, पुणे येथील अधिकारी डॉ. बबन जोगदंड यांची महाराष्ट्र शासनाने प्रतिनियुक्तीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे येथे सहाय्यक प्राध्यापक या पदावर नियुक्ती केली आहे. त्यांच्याकडे संस्थेतील विस्तार व सेवा या पदाच्या विभाग प्रमुखाची जबाबदारी देण्यात आली आहे. या विभागामार्फत संस्थेची प्रकाशने, प्रचार – प्रसिद्धी त्याचबरोबर समतादूत प्रकल्प असे कामकाज त्यांच्याकडे सोपविण्यात आले.

त्यांनी बार्टी संस्थेचे महा–संचालक सुनील वारे यांच्या उपस्थितीमध्ये नुकताच आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस बार्टीचे महासंचालक सुनिल वारे, डॉ. बबन जोगदंड यांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले. महासंचालक यांच्या हस्ते डॉ. जोगदंड यांना महामानव हा ग्रंथ तसेच पुष्पगुच्छ भेट देऊन स्वागत केले.

## एलसीबीकडून चार दुचाकीसह चोरट्यास अटक



**नांदेड (प्रतिनिधी)–** एलसीबीच्या पथकाने हदगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत चार दुचाकीसह चोरट्यास अटक केली आहे. पळसा शिवारात कारवाई करून मनाठा पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

२० ऑगस्ट रोजी पोलीस उपनिरीक्षक नागनाथ तुकडे व त्यांच्या पथकातील अंमलदार असे पो. स्टे. मनाठा गुरन १०३/२०२५ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. चोरीमधील आरोपी शोध कामी पो. स्टे. मनाठा, हदगाव हद्दीत रवाना झाले असता त्यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरुन एक युवक मोटारसायकल चोरी करुन पळसा उड्डाण पुलाच्या खाली विक्री करण्यासाठी थांबला आहे, अशी माहिती मिळताच पथकाने तेथे जावून पाहणी केली असता एकजण मोटारसायकलवर संशयीतरित्या बसलेला दिसून आला. त्या संशयीत युवकास मोटारसायकलसह पळसा उड्डाण पुलाच्या खालून ताब्यात घेवुन त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव रामा ऊर्फ सोनु किशन धनगरे (वय २४ वर्ष रा. पळसा ता. हदगाव जि. नांदेड) असे सांगितले. त्याच्या ताब्यातील मोटारसायकलचे मालकी बाबत, विचारपूस केली असता त्याने सदरची मोटारसायकल ही पळसा येथून चोरली असल्याचे सांगितले. मोटारसायकल चोरीतील आरोपी निष्पन्न करुन ४ मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणल्याबद्दल पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी पथकाचे कौतुक केले.

## पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या हस्ते पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांचा सत्कार



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** माहे जुलै महिन्यातील प्रशंसनीय कामगिरी केल्याबद्दल पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या हस्ते पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांना प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

जुलै महिन्यात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशन नांदेड (ग्रामीण) येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी माहे जुलै २०२५ मध्ये एमपीड कायद्याप्रमाणे २, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे ४, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ प्रमाणे २, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५७ प्रमाणे ८, BNSS बीएनएसएस कायदा कलम १२९ प्रमाणे १७, बीएनएसएस कायदा कलम १२६ प्रमाणे १२१ प्रतिबंधात्मक कार्यवाही करून उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सत्कार करताना अभिनंदन करुन पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांची उपस्थिती होती.

## भोकर ग्रामीण रुग्णालयातील राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अधिकारी व कर्मचाऱ्यांचे बेमुदत काम बंद आंदोलन



**भोकर (प्रतिनिधी)–** येथील ग्रामीण रुग्णालयातील राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांच्या पुर्ततेसाठी कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलन केले.

मागील १४ मार्च २०२४ रोजी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत अधिकारी व कर्मचारी यांना नियमित सेवेत समायोजन करण्यासाठी शासन निर्णय निर्गमित झाला. यास सव्वा वर्षे कालावधी होऊन अद्यापही राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी व कर्मचारी यांचे समायोजनचा शासन निर्णय घेत नाही. तसेच मानधन वाढ, रॉयल्टी, बोनस, बदली धोरण मान्य होत नसल्याने आरोग्य मंत्री महोदय महाराष्ट्र राज्य यांनी दि. ८ व १० जुलै २०२५ रोजी संघटना शिष्टमंडळास समायोजन प्रक्रिया व विविध मागण्यांबाबत दिलेल्या आश्वासनाची पूर्तता न झाल्याने दि.२१ ऑगस्ट २०२५ पासून ग्रामीण रुग्णालय भोकर येथील राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी अधिकारी व कर्मचारी बेमुदत काम बंद आंदोलनात सहभागी होत आहेत.

या बाबत ग्रामीण रुग्णालय भोकरचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रताप चव्हाण यांना राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अधिकारी व कर्मचारी यांनी निवेदन दिले. यावेळी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत ३९ गावांत पोळा सण साजरा होणार

**नवीन नांदेड(प्रतिनिधी)–** नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या ३९ गावांत शुक्रवार, दि. २२ ऑगस्ट रोजी बैलपोळा साजरा होणार आहे. या सणानिमित्त ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत पोलीस बंदोबस्त देण्यात आला असून, हद्दीतील सर्व गावांत पोळा सण साजरा होणार या ठिकाणी कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस बंदोबस्त देण्यात आल्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी सांगितले.

ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या विष्णुपुरी, वाजेगाव,काकांडी, तुप्पा, धनेगाव, भायेगाव, राहेगाव, किक्की, गोपाळ चावडी, गुंडेगाव, वांगी, मार्कंड यासह जवळपास ३९ गावांत शुक्रवार, दि. २२ ऑगस्ट रोजी पोळा सण साजरा होणार असून, या निमित्ताने पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या म ार्गदर्शनाखाली ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या आदेशानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षक, पोलीस अंमलदार, महिला पोलीस कर्मचारी, होमगार्ड बंदोबस्तसाठी गावनिहाय देण्यात आले आहेत, अशी माहिती गोपनीय शाखेचे बालाजी दंतापल्ले यांनी दिली आहे.

## रागात काय बघतोस? फुले मार्केट परिसरात २ गटांत हाणामारी

**नांदेड (प्रतिनिधी)–** रागात काय बघतोस? या क्षुल्लक कारणावरून युवकांच्या २ गटात २० ऑगस्ट रोजी रात्री १० वाजता हाणामारी झाली. त्यामुळे फुले मार्केट परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. परंतु शिवाजीनगर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळावर पोहोचून परिस्थिती आटोक्यात आणली. याप्रकरणी दोन्ही गटातील ३ जणांना शिवाजीनगर पोलिसांनी अटक केली आहे.

शहरातील भाग्यनगर येथील रहिवासी गणेश कऱ्हाळे हा फुले मार्केट भागातील नईम पान शॉप समोर २० ऑगस्ट रोजी रात्री १० वाजता उभा होता. या पान शॉपचा चालक मोहम्मद अली याचा व गणेश कऱ्हाळेचा रागात काय बघतोस? या कारणावरून वाद झाला. यावेळी कऱ्हाळे यास धक्काबुक्की व मारहाण करण्यात आली. त्यानंतर कऱ्हाळे याने त्याचे मित्र बोलावून घेतले. त्या ठिकाणी दोन्ही गटातील युवकांची एकमेकांना मारहाण झाली. या घटनेची माहिती मिळताच फुले मार्केट भागातील मुख्य रस्त्यावर अनेक पान शॉप आणि काही हॉटेल आहेत. ते रात्री उशिरापर्यंत सुरू राहतात. यामुळे अनेक वेळा किरकोळ कारणाहून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. येथे कायदा वेगळा आहे का, असा सवाल उपस्थित केला जात असून आता पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनीच दखल घ्यावी, अशी मागणी येथील नागरिकांमधून होत आहे.

पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिस्थिती आटोक्यात आणली. यावेळी पोलिसांनी गणेश कऱ्हाळे, मोहम्मद अली, शेख रहमान यांना ताब्यात घेतले. याप्रकरणी दोन्ही गटातील युवकांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात परस्पर विरोधी गुन्हे दाखल केले आहेत. मारहाण झालेल्या दोन्ही गटातील अनोळखी युवकांचा तपास सुरू असल्याचे, पोलीस निरीक्षक राजेश पुरी यांनी सांगितले. या घटने–मुळे अफवा पसरल्याने या भागात काही वेळ तणाव निर्माण झाला होता.

## दत्तात्रय पाटील बेंद्रीकर यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–** नायगाव तालुक्यातील मौजे बेंद्री येथील ज्येष्ठ नागरिक दत्तात्रय आनंदराव पाटील बेंद्रीकर यांचे दि. २१ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ९० वर्षे होते. त्यांच्यावर शुक्रवार, दि. २२ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता बेंद्री येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात्त पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## बालाजी जाधव यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–** पिंप्रणवाडी ता. लोहा येथील रहिवासी शिवाजी विद्यालय सोनखेड येथील सेवानिवृत्त शिक्षक बालाजी वामनराव जाधव यांचे गुरुवारी सायंकाळी ७ वाजता निधन झाले. त्यांचा अंत्यविधी पिंप्रणवाडी येथे शुक्रवार, दि. २२ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता होणार आहे. त्यांच्या पश्चात ४ मुले, १ मुलगी, नातू, पणतू असा परिवार आहे.

## शेषराव मोरे यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–** पानशेवडी ता. कंधार येथील ज्येष्ठ नागरिक शेषराव गोविंदराव मोरे यांचे पानशेवडी येथे गुरुवार, दि. २१ ऑगस्ट रोजी दुपारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, ४ मुली, सुना, जावई, नातू, पणतू असा परिवार आहे. शुक्रवार, दि. २२ रोजी सकाळी १० वाजता पानशेवडी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. कंधार डेपोचे हेड मेकॅनिक गणेश मोरे यांचे ते बंधू व राजू मोरे यांचे काका होत.

## बालकिशन कळसकर यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील बसवेश्वर नगर जुना कौठामधील रहिवासी तथा नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे सेवानिवृत्त कर्मचारी बालकिशन दगडोबा कळसकर यांचे वृद्धापकाळाने सोमवार, दि. १८ ऑगस्ट रोजी निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ७९ वर्षे होते.

मंगळवार, दि. १९ ऑगस्ट रोजी त्यांच्या पार्थिवावर रामघाट जुना मोंढा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात १ मुलगा, २ मुली, जावाई, नातू, पणतू असा परिवार आहे. प्रा. डॉ. प्रशांत कळसकर यांचे ते वडील होत.

## नांदेड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने आ. चिखलीकर यांच्या उपस्थितीत पूरग्रस्तांना अन्नधान्य वाटप

### जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर यांचा पुढाकार



**नांदेड (प्रतिनिधी)–** मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद, बिहारपूर, भासवाडी, रावणगाव, हसनाळ, भिंगोली आदी गावांना पुराच्या पाण्याचा मोठा फटका बसला आहे. पूर परिस्थितीमुळे येथे जनजीवन विस्कळीत झाले. त्यामुळे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शनात राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर यांच्या वतीने पूरग्रस्तांना अन्नधान्याचे वाटप करण्यात आले आहे.

मुक्रमाबाद परिसरात झालेल्या ढग–फुटीसदृश्य पावसाने या भागातील अनेक गावांना पुराच्या पाण्याचा फटका बसला. चुकीच्या वेळी घळभरणी करण्यात आल्याने धरण क्षत्रातील अनेक गावांत पुराचे पाणी शिरले. परिणामी अनेकांना आपला जीव गमवावा लागला. असंख्य पशु पुराच्या पाण्यात मृत्युम ुखी पडले आहेत. नागरिकांना खाण्यासाठी अन्न नाही, पिण्यासाठी शुद्ध पाणी नाही, अशी परिस्थिती या भागात निर्माण झाली आहे. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी अतिवृष्टीग्रस्त भागात पाहणी दौरा करून नागरिकांशी, शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्यांना धीर दिला. राज्य सरकार आपल्या पाठीशी आहे, त्यामुळे काळजी करण्याचे कारण नाही, निश्चितपणे प्रत्येकाला मदत मिळेल असा विश्वासही त्यांनी दिला. यावेळी येथील गंभीर परिस्थिती लक्षात घेता नागरिकांना तांदूळ, दाळ, साखर, चहा–पत्ती, बिस्कीट आदी वस्तूंचे राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर यांच्या पुढाकारातून वाटप करण्यात आले. तसेच गुरुद्वारा बोर्डाचे अध्यक्ष डॉ. विजय सदबीरसिंग यांच्या टीमने सर्व गावात जेवण व वैद्यकीय सुविधा पुरविल्या आहेत. अनेक संस्था म दतीसाठी पुढे येत आहेत. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष व्यंकटराव पाटील गोजेगावकर यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

दरम्यान जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी पुरात अडकलेल्या लोकांना काढण्याची वेळीच भूमिका घेतली तर एनडीआरएफ टिमने चांगले काम केले असा गौरवपूर्ण उल्लेख आ. चिखलीकर यांनी मदतकार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांचा केला आहे.

धरणाची गाळभरणी जनतेला विश्वासात न घेता केल्याने जनतेचा रोष व्यक्त होत आहे. पुरामुळे मुक्रमाबाद येथील ११८ ते १२० जनावरे वाहून गेली. त्यात एकट्या बालाजी कंकरे या शेतकऱ्याच्या ६२ जनावरांचा समावेश आहे. रावनगावमध्ये कुठल्याही सुविधा उपलब्ध नसल्याचा संताप जनतेने व्यक्त केला आहे. रावणगावमध्ये २०० जनावरे वाहून गेल्याचा अंदाज आहे.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com